गुरुवार, 29 सप्टेंबर 2022
⊙ किमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - 02 ⊙ अंक - 57
Title Code : MAHMAR51117

# आधुनिक केसरी

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● THURSDAY 29 SEPTEMBER 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-57 ● TITLE CODE : MAHMAR51117 ● PAGE-12 ● PRICE-5

## केंद्राची पीएफआयवर बंदी

### सरकारच्या निर्णयानंतर राजकीय वर्तुळात उलटसूलट चर्चा

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : केंद्र सरकारने पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया अर्थात पीएफआय या संघटनेवर बंदी घालण्याचा निर्णय घेतला आहे. सरकारच्या या निर्णयानंतर राजकीय वर्तुळात वेगवेगळ्या प्रतिक्रिया व्यक्त करण्यात येत आहेत. पीएफआयप्रमाणेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघावरही (आरएसएस) बंदी घालावी अशी मागणी काँग्रेस तसेच अन्य पक्षांनी केली आहे. असे असताना पीएफआय संघटनेतील पदाधिकाऱ्यांनी संघटना बरखास्त करण्याचा निर्णय घेतला आहे. केरळ पीएफआयचे सचिव अब्दुल सत्तार यांनी तशी माहिती दिली आहे.**



पीएफआयचे सर्व सदस्य तसेच जनतेला सांगण्यात येत आहे की, पीएफआय ही संघटना बरखास्त करण्यात येत आहे. केंद्रीय गृहमंत्रालयाने पीएफआयवर बंदी घालण्याचा निर्णय घेतला आहे. आम्ही कायद्याचे पालन करणारे नागरिक असून सरकारच्या या निर्णयाला मान्य करतो, असे संघटना बरखास्तीबाबतची माहिती देताना अब्दुल सत्तार म्हणाले आहेत. याआधी पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया (पीएफआय) या संघटनेला केंद्र सरकारने बेकायदेशीर संघटना घोषित केलं आहे. पुढील पाच वर्षांसाठी ही संघटना आणि त्यांच्याशी संलग्न संस्थांना हा निर्णय लागू असेल, असे केंद्राने म्हटले आहे. केंद्रीय गृहमंत्रालयाने पीएफआयची स्थापना करणारे काही सदस्य हे स्टूडंट्स इस्लामिक मुव्हमेंट ऑफ इंडिया म्हणजेच 'सीमी'चे सदस्य असल्याची माहिती दिली आहे. या संघटनेचे जमात-उल-मुजाहिद्दीन बांगलादेश (जेएमबी) या संघटनेशी संबंध असल्याची माहितीही समोर आली आहे. या दोन्ही बंदी घालण्यात आलेल्या दहशतवादी संघटना आहेत.

## असामाजिक तत्त्वांवर राज्य कठोर कारवाई करेल : देवेंद्र फडणवीस

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** 'पीएफआय'बाबत सातत्याने इनपुटस होते. समाजात अफवा पसरवून त्यांना हिंसाचारासाठी प्रवृत्त करण्यासाठी पैसा खर्च केला जात होता. त्यामुळे सर्व ते पुरावे हाती आल्यानंतरच केंद्र सरकारने या संघटनेवर बंदी आणली आहे. राज्यात सुद्धा कोणत्याही असामाजिक तत्वांची गय केली जाणार नाही, असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज सांगितले. मुंबईत आज सकाळी माध्यमांशी बोलताना त्यांनी सांगितले की, केरळने पहिल्यांदा पीएफआयवर बंदीची मागणी केली होती आणि त्यासाठी केंद्र सरकारकडे पाठपुरावा केला होता. केंद्र सरकारने बंदी टाकली, हे चांगलेच केले. असे करताना राज्यांना सुद्धा अधिकार दिले आहेत. राज्य सरकार असामाजिक तत्वांवर कठोर कारवाई करेल. दहशतवादी कृत्य करून देशाला खिळखिळे करण्याचा प्रयत्न पीएफआयच्या माध्यमातून होत होता. एकप्रकारे छुप्या पद्धतीने या सर्व कारवाया सुरू होत्या. वेगवेगळ्या माध्यमातून समाजात तेढ निर्माण करून सामाजिक सलोखा बिघडविण्याचे काम केले जायचे. हिंसाचारासाठी पैसा खर्च करून त्यासाठी प्रवृत्त करण्याचे काम केले जायचे. त्रिपुरात जी घटनाच घडली नाही, त्या मशिद पाडल्याच्या खोट्या बातम्या, चित्रफिती पसरवून अमरावतीसारख्या शहरात तोडफोड झाली. या संघटनेच्या आर्थिक गतिविधी, कशापद्धतीने छोट्या-छोट्या रकमा अनेक खात्यांमध्ये जमा केल्या जायच्या, या साऱ्या बाबी उघडकीस आल्या. केंद्राने बंदी घालताना प्रत्येक राज्यांना काही अधिकार दिले आहेत. पीएफआय आणि त्यांच्याशी संबंधित 6 संघटनांवर राज्य सरकार सुद्धा कारवाई करेल. सिमीवर बंदी घातल्यानंतर इतर संघटना जन्माला आल्या. येणाऱ्या काळात अनेक बाबी समोर येतील, असेही देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी बोलताना सांगितले.

## चर्चेतली बातमी

### आ. संजय शिरसाट यांनी कंत्राटदाराला धमकावले : अ‍ॅड. गुणरत्न सदावर्ते

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** अ‍ॅड. गुणरत्न सदावर्ते यांनी शिंदे गटातील आमदार संजय शिरसाट यांच्यावर गंभीर आरोप केला आहे. संजय शिरसाट यांनी बाबा कंस्ट्रक्शन्स या बांधकाम क्षेत्रातील कंपनीला धमकावले आहे. विशेष म्हणजे या धमकीप्रकरणाशी निगडित एक कॉल रेकॉर्डिंग त्यांच्याकडे असल्याचा दावाही सदावर्ते यांनी केला आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाच्या न्यायधीशांच्या निवासासाठी इमारत बांधण्यात येत आहे. या बांधकामासाठी निविदा प्रक्रिया योग्य पद्धतीने राबवलेली गेली नाही. हे कंत्रात ४७ कोटी रुपयांचे आहे. वंडर ही कंपनी अपात्र आहे. या कंपनीने निविदा भरताना बीडमध्ये सात मजली रुग्णालयाचे बांधकाम केल्याचे सांगितले आहे. मात्र ती इमारत सात मजल्यांची नाही. चुकीची माहिती सादर करून या कंपनीने कंत्रात मिळवले. वर्क ऑर्डर देण्याआधी आमचे पक्षाकार बाबा कंस्ट्रक्शन कंपनीला संजय शिरसाट यांच्या स्वीय सहाय्यकाने बोलावले. तेथे आमच्या पक्षकाराला धमकी देण्यात आली. ही बाब न्यायालयाच्या लक्षात आणून देण्यात आली आहे, असे गुणरत्न सदावर्ते म्हणाले. शिरसाट यांच्याविरोधात न्यायालयात एक तक्रार दाखल करण्यात आली आहे. निविदा भरण्यापासून परावृत्त करणे. स्वीय सहाय्यकाच्या माध्यमातून धमकावणे, कामात अडथळा निर्माण करणे, असे आरोप त्यांच्यावर आहेत. आमचे पक्षाकार म्हणजेच बाबा कंस्टक्शन कंपनीच्या लोकांना शिरसाट यांच्या पीएने बोलावून धमकावले," असा दावा सदावर्ते यांनी केला आहे.

## अशोक चव्हाण यांच्या विधानामुळे शिंदेंची कोंडी

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** २०१४ ते १९ दरम्यान राज्यात अस्तित्वात असलेल्या भारतीय जनता पार्टी-शिवसेना युती सरकारच्या काळातच युती तोडून काँग्रेस-राष्ट्रवादी पक्षासोबत सरकार स्थापन करण्याचा प्रस्ताव शिवसेनेकडून आला होता. एकनाथ शिंदे यांचाही त्या शिष्टमंडळात समावेश होता, असा गौप्यस्फोट राज्याचे माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेसपक्षाचे ज्येष्ठ नेते अशोक चव्हाण यांनी केला.
२०१९ मध्ये युतीमध्ये निवडणूक लढवून बहुमत मिळालेले असतानाही शिवसेनेने शेवटी काँग्रेस-राष्ट्रवादी पक्षासोबत येऊन सरकार स्थापन केले.
या घटनेने राजकीय जाणकारांना आश्चर्याचा धक्का बसला पण भाजपासोबत आता राहायचे नाही ही शिवसेनेची भूमिका त्यापूर्वी म्हणजे देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील युती सरकारच्या काळातच झाली होती. आपण, म्हणजे काँग्रेस आणि राष्ट्रवादी एकत्र येऊन सरकार स्थापन करू अशा आशयाचा प्रस्ताव घेऊन शिवसेनेचे वरिष्ठ नेते ज्यात सध्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचाही समावेश होता. या सर्वांनी माझी माझ्या मुंबईतील कार्यालयात भेट घेतली होती असे चव्हाण यांनी सांगितले.
अशा प्रकारचे सरकार स्थापन करायचे असल्यास तुम्ही आधी पवार साहेबांशी चर्चा करा असे मी या नेत्यांना सांगितले होते. परंतु ते पवार साहेबांना पुढे भेटले किंवा नाही याबाबत मला नंतर काहीही माहिती नाही असेही चव्हाण यांनी स्पष्ट केले.



दोन महिन्यांपूर्वी राज्यातील महाविकास आघाडीत शिवसेनेची कोंडी होत आहे असे कारण सांगून शिवसेनेत बंड करणारे एकनाथ शिंदे यांना युती सरकारच्या काळात भारतीय जनता पक्षासोबत फारकत घ्यायची होती ही माहिती आजच्या राजकीय पार्श्वभूमीवर खळबळजनक आहे. अशोक चव्हाण यांच्या या खुलाशामुळे विद्यमान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना भारतीय जनता पक्षाबाबत नेमके काय वाटते हा प्रश्न उपस्थित होणार आहे.

## आ. बच्चू कडू पुन्हा अडचणीत

आधुनिक केसरी न्यूज


**अचलपूर :** अचलपूर तालुक्यातील गणोजा गावात बच्चू कडू एका रस्त्याच्या उद्घाटनासाठी गेले. मात्र, तेथे रस्त्याच्या कामात भ्रष्टाचाराचा आरोप झाल्याने गदारोळ झाला आणि संतापलेल्या बच्चू कडूंनी थेट आपल्याच कार्यकर्त्यांच्या कानशिलात लगावली. या घटनेचा व्हिडीओ चांगलाच व्हायरल झाला आहे. त्यामुळे बच्चू कडूंच्या अडचणीत वाढ होण्याची शक्यता आहे. गणोजातील रस्त्याच्या कामावर एका कार्यकर्त्यांने गंभीर आक्षेप घेतले होते. बच्चू कडू या रस्त्याचं उद्घाटन करण्यासाठी आले असताना या कार्यकर्त्यांने हे आक्षेप बच्चू कडूंसमोरही मांडले. त्यावेळी बच्चू कडूंनी ठेकेदार आणि इंजिनियरसमोरच कार्यकर्त्यांची बाजू ऐकून घेतली. मात्र, ठेकेदार रस्त्याचं काम योग्य झालं म्हणत होता, तर कार्यकर्ता कामात घोटाळा झाल्याचा आरोप करत होता. स्त्याचं काम ज्या भागासाठी मंजूर झालं होतं त्या भागात रस्ता झाला नाही, असा प्रमुख आक्षेप तक्रारकर्त्या कार्यकर्त्यांने केला. तसेच ज्या भागात रस्त्याचं काम झालं नाही तो कुठे गेला असा सवाल केला. यावर बच्चू कडू संतापले आणि तू मुर्खासारखे काहीही बोलतो असं वक्तव्य केलं.

## दसऱ्याआधीच एक कोटी केंद्रीय कर्मचाऱ्यांची दिवाळी

### मोदी सरकारकडून महागाई भत्त्यात घसघशीत वाढ; कर्मचाऱ्यांचा मोठा फायदा

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** महागाई भत्त्यासंदर्भातील निर्णयाची वाट पाहणाऱ्या लाखो सरकारी कर्चमाऱ्यांची प्रतीक्षा आज संपली. नवरात्रोत्सवादरम्यान सामान्यपणे महागाई भत्ता केंद्रीय कर्मचाऱ्यांना मिळतो. मात्र हा भत्ता मिळण्याआधीच केंद्रीय मंत्रिमंडळाने महागाई भत्त्यामध्ये वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. महागाई भत्त्यामध्ये चार टक्क्यांनी वाढ करण्यात येणार आहे. त्यामुळे आता ३४ ऐवजी ३८ टक्के भत्ता सरकारी कर्मचाऱ्यांना मिळणार आहे. केंद्र सरकारमधील ५० लाखांहून अधिक कर्मचाऱ्यांना याचा फायदा होणार आहे. तर ६२ लाखांहून अधिक पेन्शनधारकांनाही या निर्णयाचा लाभ मिळणार आहे. महागाई भत्त्या हा कर्मचाऱ्यांच्या पगाराचा एक भाग आहे जो मूळ पगाराच्या विशिष्ट टक्केवारी म्हणून मोजला जातो जो नंतर मूळ पगारात जोडला जातो. केंद्रातील मोदी सरकारने दसऱ्याच्या आधीच हा निर्णय घेतल्याने केंद्रीय कर्मचाऱ्यांचा याचा मोठा फायदा मिळणार आहे. जर मूळ वेतन/पेन्शन रुपये २५ हजार रुपये असेल, तर ३८ दराने डीए अथवा डीआर ९ हजार ५०० रुपये असेल. ३४ टक्के दराने, डीए अथवा डीआरची रक्कम ८ हजार ५०० रुपये असेल. याचाच थोडक्यात अर्थ असा की पगारामध्ये एक हजार रुपयांची वाढ होईल. सामान्यपणे ही वेतनवाढ नवरात्रोत्सवाच्या आसपास मिळते. मार्चच्या सुरुवातीला, मंत्रिमंडळाने केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांसाठी महागाई भत्ता (डीए) आणि पेन्शनधारकांसाठी महागाई भत्ता (डीआर) पूर्वी १ जानेवारी २०२२ च्या ३१ टक्क्यांवरून तीन टक्क्यांनी वाढवून ३४ टक्के केला होता. आता त्यात पुन्हा चार टक्क्यांची वाढ करण्यात आल्याने केंद्रीय कर्मचाऱ्यांसाठी दसऱ्याआधीच दिवाळी आली असं म्हणता येईल.




> जर मूळ वेतन/पेन्शन रुपये ३५ हजार रुपये असेल, तर ३८ दराने डीए अथवा डीआर १३ हजार ३०० रुपये असेल. ३४ टक्के दराने, डीए अथवा डीआरची रक्कम ११ हजार ९०० रुपये असेल. याचाच अर्थ असा की पगारामध्ये एक हजार ४०० रुपयांची वाढ होईल.

> जर मूळ वेतन/पेन्शन रुपये ४५ हजार रुपये असेल, तर ३८ दराने डीए अथवा डीआर १७ हजार १०० रुपये असेल. ३४ टक्के दराने, डीए अथवा डीआरची रक्कम १५ हजार ३०० रुपये असेल. म्हणजेच पगारामध्ये एक हजार ८०० रुपयांची वाढ होईल.

> जर मूळ वेतन/पेन्शन रुपये ५५ हजार रुपये असेल, तर ३८ दराने डीए अथवा डीआर २० हजार ९०० रुपये असेल. ३४ टक्के दराने, डीए अथवा डीआरची रक्कम १८ हजार ७०० रुपये असेल. याचा अर्थ असा की पगारात दोन हजार २०० रुपयांची वाढ होणार.

> जर मूळ वेतन/पेन्शन रुपये ६५ हजार रुपये असेल, तर ३८ दराने डीए अथवा डीआर २४ हजार ७०० रुपये असेल. ३४ टक्के दराने, डीए अथवा डीआरची रक्कम २२ हजार १०० रुपये असेल. याचाच थोडक्यात अर्थ असा की पगारामध्ये दोन हजार ६०० रुपयांनी वाढ होईल.

सरकारी कर्मचाऱ्यांना साधारणपणे या वर्षाच्या उत्तरार्धात डीएमधील वाढ (सातव्या वेतन आयोगावर आधारित) घोषणेप्रमाणे प्राप्त होते.




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# महिलांचा आंदोलनातील सहभाग - अशिक्षित किंकरी देवीचे योगदान

आधुनिक केसरी

त्यांनी तिचे लग्न वयाच्या १४ व्या वर्षीच श्यामू राम नावाच्या एका वेठबिगारी करणाऱ्या मजुराशी करून दिले. पण श्यामू रामचा काही वर्षातच एका आजाराने दुर्दैवी मृत्यू झाला आणि वयाच्या २२ व्या वर्षीच किंकरी देवीच्या माथी वैधव्य आले. उदरनिर्वाहासाठी तिला हातात झाडू घ्यावा लागला. स्वीपर म्हणून ती काम करू लागली. ही स्वच्छता करता करता निसर्गावर अन्याय करणाऱ्या दुष्ट विचारांची सुद्धा सफाई करावी असे तिच्या मनाने घेतले. त्या वेळी खाणमालकांची नजर हिमालयातील चुनखडीच्या खाणींकडे वळली होती. या खाणींचे उत्खनन करून व्यापारातून अफाट नफा कमावणे सुरु असताना ही मंडळी निसर्गाचे मात्र अतोनात नुकसान करू



लागली.
खाणींसाठी खोदकाम सुरु असताना झाडे तोडली जाऊ लागली. हिमालयाचे संरक्षक कवच तुटू लागले. त्यातील माती घेऊन नद्या वेगाने खालच्या प्रदेशावर आक्रमण करू लागल्या. पुराचे संकट नित्याचे झाले. शेतातील पिके नष्ट होऊ लागली. दरडी कोसळून त्याखाली घरे, माणसे, गुरुढोरे गाडली जाऊ लागली. खाणीतील चुनखडीयुक्त माती पाण्यात मिसळून पिण्याच्या पाण्याचे स्रोत दूषित होऊ लागले. या सगळ्या गोष्टींकडे गावकरी असहाय होऊन बघत

**एक लढा असाही ( भाग-5)**

होते. किंकरी देवीने मात्र या अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्याचे ठरवले. तिने आपल्या स्वतःच्या आणि आजूबाजूच्या गावातील गावकऱ्यांना खाणमालकांनी सुरु केलेल्या बेसुमार खोदकामाबद्दल आणि त्याच्या होणाऱ्या दुष्परिणामांबद्दल माहिती द्यायला सुरुवात केली. लोकांमध्ये हळूहळू जागृती होऊ लागली. किंकरी देवीच्या म्हणण्यात तथ्य आहे हे त्यांना कळू लागले. **(क्रमशः)**



## आनंदी पहाट

### जशी आपली संगती, तशी आपली मनोवृत्ती

आधुनिक केसरी

लहापणापासून आपल्या बालमनावर मित्र परिवारातील प्रत्येकाचा कमी-अधिक प्रमाणांत चांगला-वाईट परिणाम होत असतो. अनकेदा आपल्या अनुकरणप्रिय मनाला मित्रमंडळीत सतत राहून त्यांचे अनुकरण करायची सवय जडलेली असते. आपण ज्या परिसरांत, वातावरणांत वावरत असतो, त्याचा थेट परिणाम आपल्या अंतर्मनावर होत असतो. आपल्या सोबत्यांचा आपल्या कार्यावर, व्यक्तिमत्वावर, वागण्या-बोलण्यावर, व्यवहारावर आणि चैतन्यावर प्रखर प्रभाव पडत असतो. म्हणून आपल्या सभोवती सुस्वभावी, धार्मिक, उच्च स्तरावर जागृत मनोवृत्तीचे लोक असणे महत्वाचे असते.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

"जशी आपली संगती, तशी आपली मनोवृत्ती" ही बाबही तितकीच महत्वाची आहे. आपण आपल्या सोबत्यांची निवड विवेकपूर्वक करत असल्याची आपल्याला जाणीव होणे जरुरीचे असते. कारण, आपली संगत आपल्यावर वाईट प्रभाव पाडू शकते, ह्याचे विस्मरण होऊन चालणार नाही. जगण्यापलीकडचे जीवन जगताना संगत ही खूप महत्वाची बाब असते. जीवनात यशस्वी होण्यासाठी जशी उच्च शिक्षणाची गरज असते, तशीच प्रत्येक व्यक्तीला चांगल्या संगतीची सुद्धा गरज असते, हे प्रत्येक व्यक्तीने कधीही विसरून चालणार नाही. प्रत्येक व्यक्तीची ओळख त्या व्यक्तीच्या मित्रांवरून होत असते. जगात सुष्ट-दुष्ट, चांगली-वाईट, जवळची-लांबची, आपली-परकी अशी माणसे असतातच. समविचारी माणसांची आपापसांत मैत्री लवकर होत असते. वाईट संगतीत वाईट गुण आपल्यात येण्यास वेळ लागत नाही. श्रेष्ठ व्यक्तीच्या सहवासात सामान्य माणूस आला तरी त्याचा कायापालट होतो. परीसाच्या संगतीत लोखंड आल्यावर त्याचे सोने होते. त्यासाठी संगतीचा परिणाम विपरीत ठरू नये, हेही लक्षात घ्यावे. आपल्या सोबत्यांचा आपल्या कार्यावर, व्यक्तिमत्वावर, वागण्या-बोलण्यावर, व्यवहारावर आणि चैतन्यावर प्रखर प्रभाव पडत असतो. म्हणून आपल्या सभोवती सुस्वभावी, धार्मिक, उच्च स्तरावर जागृत मनोवृत्तीचे लोक असणे महत्वाचे असते.



आधुनिक केसरी

### सावळाच वाली | वैष्णवांचा ||

**साजिरा गोजिरा | विठ्ठल सावळा ||**
**आत्म्याचा जिव्हाळा | विटेवरी ||१||**

**संसाराची माया | मोहात सापडे ||**
**दुःखाचेच कडे | भोवताली ||२||**

**स्वार्थाचे लिंपन | वृत्तीस फासले ||**
**तीने नासवीले | उभ्या जन्मा ||३||**

**भजनी कीर्तनी | रमले ना मन ||**
**आता आले भान | कृपा झाली ||४||**

**पंचमहाभूते | दिंडीत नाचली ||**
**सावळाच वाली | वैष्णवांचा ||५||**



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## "निरुपण"

आधुनिक केसरी

**जगदम्ब नमस्तुभ्यं वरप्रदे धनप्रदे।**
**धान्यप्रदे नमस्तुभ्यं स्वास्थ्यप्रदे नमो नमः।। २६ ।।**
हे वरदायिनी, धनदायिनी, जगदंबिके, तुला नमस्कार असो. धान्यदायिनी, स्वास्थ्यदायिनी, तुला नमस्कार असो.
**जगदम्ब नमस्तुभ्यं दयावति कृपावति।**
**जगदम्ब नमस्तुभ्यं सद्वंशवृद्धिहेतवे।। २७ ।।**
दयावती, कृपावती, जगदंबिके, तुला नमस्कार असो. सद्वंशवृद्धीसाठी जगदंबिके, तुला नमस्कार असो.



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

## नवरात्राची चौथी माळ



आधुनिक केसरी

आज अश्विन शुद्ध चतुर्थी, दि. 29/9/2022 मातेची आजची पूजा विश्वव्यापी रूपात केली जाते. जळी,स्थळी काष्ठी, पाषाणी या सर्वात मातेचा वावर आहे म्हणून "विश्वव्यापक जननी" असे म्हणले आहे. वाईटांचा त्याग करा व सन्मार्गाची कास धरा हा तर हिंदवी संस्कृती चा गाभा आहे. त्यासाठी तर गणेशोत्सव, दसरा दिवाळी। सारखे सण आपण साजरे करतो. आज आपण "शारदा"या विद्येच्या रूपात असलेल्या जगदानंददायिनी मातेची शब्दरूपी पूजा बांधणार आहोत. मला खात्री आहे "बालकाचे बोबडे बोल माता न जाणी हीनपण"म्हणजे जर काही चुकलं तर माता नक्कीच क्षमा करेल.अशी आशा करून आजचा शारदोत्सव साजरा करूया. वेदांची जननी, ब्रम्हदेवाची कन्या,नादाचे जन्मस्थान, आणि असुर प्रव्रुतीशी लढणारी,दुष्टांचे निर्दलन करणारी अशी शारदा होय. खरं पहायला गेलं तर परमात्मस्वरूप कल्पनेच्या पलिकडे आहे. शब्द तेथे पोहचू शकत नाहीत त्याला मानवी कल्पनेच्या कक्षेमध्ये आणून "परमात्मा" असे नाव देणारी उपमेच्या पलीकडे असणाऱ्या पण उपमेच्या प्रातांत आणणारी ही "शारद"आहे. देवी शारदा ही कवी लेखक मंडळींना स्फूर्ती देणारी देवता आहे. ती जशी "विश्वव्यापी आहे. तशी ती योग्याच्या समाधीमध्ये आहे. वीर धाडसी पुरूषाच्या निर्भतेमध्ये शारदा आढळते. अनेक भव्यदिव्य घटना घडण्यामागे शारदेचाच आशिर्वाद असतो. शारदा अनेक विश्व निर्माण करते. तिच्या हातात शस्त्र आहेत. प्रसंग पाहून ती शत्रुचा निप्पात करते शत्रुला त्राहीमाम करून सोडते हे एक महत्त्वाचे रूप पहायला मिळते. विश्वातील सौदर्याची ती सुंदर स्वामिनी पण आहे. सुर्याच्या तेजात एकरूप होणारी आहे. मोक्षाचे वैभव देणारी मंगलात मंगल करणारी जीवनकला आहे. साधकाला आत्मचिंतनाची कला शिकवणारी आणि सिध्दांच्या अंतःकरणात समाधिरूपाने स्थिर होणारी शारदाच आहे. ती जशी वेदमाता,ब्रम्हसुता,प्रसंगी कठोर होणारी महामाया आहे तशीच वाग्देवता पण आहे. शारदा म्हणजे ईश्वराची निवांत निर्मळ आणि निश्चल अवस्था आहे. माणसाच्या मनातील विचार शब्दांचे माध्यम घेऊन प्रगट होतो हे शारदे मुळेच शक्य झाले आहे. आज आपण आधुनिकीकरण झालेल्या "स्वातंत्र्याला 75 वर्षे पूर्ण झालेल्या"स्वतंत्र भारताचे नागरिक म्हणून "शारदोत्सव"साजरा करत आहोत तर मित्रांनो आपण या निमित्ताने संस्कृती व समाजमन यांना वैचारिक पातळीवर एकत्र आणण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करूया. आपल्या दैनंदिन व्यवहारात, जगण्यात जो उथळपणा,भंपकता,समोरच्याला सतत कमी समजणे व मी कसा मोठा आहे असे स्वयंघोषित मोठेपणाचा आवेशात असणे ,यावर सर्व समाजाने परिवर्तनाचा वारसा जपला पाहिजे. वैचारिक बैठक, तारतम्य, एकमेकांना आदर देणे,विनाकारण वाचाळता यावर नियंत्रण राखलं गेलं पाहिजे. तुम्ही दररोज रांगा लावून देवीचं दर्शन घेता, रासगर्भा खेळा,दांडिया खेळा,महिला वर्गाने सोळा श्रुंगार करा रोज नवनव्या साड्या नेसा भरपूर दागिने घालून आपली हौस भागवा तुम्हाला कुणीही मनाई केली नाही ही आपली संस्कृती आहे. पण कर्तव्याला विसरू नका.परस्पर सामंजस्य,बंधुभाव एकता मनामनात असलेली कटुता संपवणे ती नष्ट करणे. हा संदेश सतत ध्यानात ठेऊन समाजमन एकत्र करण्याचा संकल्प करूया हे देवीला शारदेला हवे आहे.



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

**सहकुटूंब सहपरिवार। दास आम्ही हे घरदार।**
**तव पदी अर्पु असार। संसाराहित हा भार।**

अशा या बंधरूपायै शारदेला माझा वारंवार नमस्कार असो.

## माहुरची रेणुकामाता

### चौथी माळ

आधुनिक केसरी

मराठवाड्यातील बहुतेक सर्वच परिवाराची "कुलदेवी - माहुरची रेणुका माता आणि कुलदेव-तिरुपती बालाजी "आहेत. " पारिवारिक कुलाचार "म्हटले की ..माहूरला जाणे .आणि सहकुटुंब सहपरिवार .श्री.रेणुकामातेची ओटी -भरणे ", भोगी -" अभिषेक, महानवैद्य " असा साग्रसंगीत कुलाचार केल्याशिवाय मनाला समाधान मिळत नाही ", हेच खरे. दर्शन यात्रा ...विलंब होईल ..पण.. " माहूरला जाऊन रेणुकामाता भोगी -पूजा आणि दर्शन घेणे " ही मनाची पारंपारिक श्रद्धा आहे.
माझ्या आठवणीतली. माझी पहिली माहूर यात्रा करण्याचा, आणि श्री. रेणुकामातेचे दर्शन घेण्याचा योग आला ..तो ४५ वर्षापूर्वी... १९७६ साली माझे लग्न झाले. त्यावेळी नोकरीच्या निमिताने आम्ही ..उदगीर या गावी होतो .
माहूरला जाण्यासाठी " तारखा ..तिथी आणि शुभ दिवस ..असा शुभ योग जुळून आला आणि मी आणि माझी पत्नी "या नवविवाहित जोडप्याला घेऊन माझ्या आईवडिलांनी आमची "वर -यात्रा " केली. त्या वेळचा म्हणजे -.सत्तरच्या दशकातील ..प्रवास .आजच्या आधुनिक काळातील सुखसोयीच्या मनाने ..महाकठीण होता. उदगीर ..व्हाया हिंगोली .( माझी सासुरवाडी ) असे करीत आम्ही ..तीन दिवसीय " माहूर मुकामी पोंचलो.. बसमधून उतरताच तिथल्या गुरुजींनी ..कुठून आलात ? नाव -घराणे कोणते ? .असे विचारले ..
आम्ही खुलासा करीत ..आमच्या कुलाची माहिती दिली मग आमच्या अधिकृत गुरुजींच्या घरी आम्ही मुकामास राहिलो. पहिल्यादिवशी ..प्रवास थकवा -विश्रांती , दुसरे दिवशी ..यथासांग कुलाचार पूजन ,आणि लगेच त्या दिवशी निघायचे नसते "या पद्धतीनुसार तिसरे दिवशीच्या ..पहाटे परतीच्या प्रवासास आरंभ करायचा . असा हा एकूण कार्यक्रम झाला.
तेव्हाचे माहूर हे गाव ..अगदी छोटेसे ..दुर्गम भागातले ..असल्यामुळे तिथे जातांना एक वेगळीच भावना मनात येई. घनदाट जंगल , डोंगरावरची हिरवाई , आणि घाट असलेला "हे पहाणे खूप छान वाटणारे आहे असे खूप ऐकून होतो , म्हणूनच माहूर"पाहण्याची एक वेगळीच उत्सुकता मनात होती. आजच्या सारखे सकाळी जाऊन संध्याकाळी आपापल्या घरी परत .अशी दर्शन फेरी नसायची. मोजक्या एसटी बस असायच्या. गडावर देखील बस जात नसे ..त्यामुळे आम्ही ज्याकाळात आमची माहूर यात्रा केली ..तो एक अविस्मरणीय अनुभव आहे. ही पहिली यात्रा करतांना ..महिलामंडळ बैल गाडीत बसलेले आणि पुरुष मंडळी ..पायी पायी चालत ..गडावर पोंचले .. रेणुकामाता डोळे भरून पाहिली ..त्याक्षणी ..चालण्याचे श्रम "विसरून गेली ..आईच्या समोर आरती करतांना मन भरभरून आले. मंदिर पायर्या उतरून आल्यवर ..तीर्थक्षेत्री .खेळणी घेण्याचा , साखर-फुटाणे , देवीचा ..तांबुल-प्रसाद, हळदी -कुंकू , देवीची साडी "या वस्तू आणि गोष्टी ...सामनात भरतांना ..मोठी हुरहूर वाटयची ..सोपी नसलेली ही यात्रा ..पुन्हा लवकर घडो आई " ,अशी प्रार्थना करून बसच्या खिडकीतून मागे वळून पहात - ..गडावरील रेणुकामाता , दत्त शिखर , अनुसयामाता , हे सारं मनात साठवले. आणि एकूणच आमचा हा पहिलावहिला " माहूर -प्रवास , रेणुकामातेच्या गडावर घालवलेले क्षण ..भक्तांची लगबग ,घाई , हे सगळ अनेक दिवस मनात सतत येत असे. मित्रांनो .आजच्या काळात माहूर दर्शन यात्रा ..ट्रीप झाली आहे ..पण.. जुन्या यात्रेत जो आनंद मिळायचा ..तो आताच्या सुखद यात्रेत नाही .हे ही तितकेच खरे.,तुम्हाला ही असेच वाटते का ?

**जागर देवी दर्शनाचा**



अरुण वि. देशपांडे
संपर्क क्र. 9850177342

**माझी स्वलिखित चवथ्या माळेची -एक छोटी रचना**

माहूरगडावरी रेणुकामाता वास करी
घेण्य दर्शन मातेचे जाऊ या गडावरी
श्री क्षेत्र माहूर पूर्णपीठ हो शक्तीचे
माय रेणुका सर्वांचे रक्षण करी ||
आराधना करावी देवी मातेची
कृपा भक्तांवरी आई जगदंबेची ||
||जय जगदंब ||

# अन्न व औषध प्रशासन कुंभकर्णी झोपेत

## लासूर स्टेशन जिल्ह्यातील भगरीच्या विषबाधेचे प्रमुख केंद्र?

आधुनिक केसरी न्यूज

**गुलाब वाघ**

**गंगापूर :** लासूर स्टेशन जिल्ह्यातील भगरीच्या विषबाधेचे प्रमुख केंद्र बनलेले असताना अन्न व औषध प्रशासन कुंभकर्णी झोपेत आहे.सदर भगर व्यापाऱ्यांवर स्थानिक पोलिसांनी जामीनपात्र गुन्हा दाखल न करता अन्न व औषध विभागाने भा.द.वी कलम 328 अन्वये आजामीनपात्र गुन्हा दाखल करण्याची नागरिकांनी मागणी केली आहे. लोकांना काय खावे कळत नाही, असे उद्‌गार अन्न व औषध प्रशासन पथकातील विभागाच्या महिला अधिकाऱ्यांचे काढले.तेव्हा रुग्णांचे नातेवाईक संतप्त झाले होते. त्या महिला अधिकाऱ्याच्या हातातील पंचनामा अर्ज घेऊन चूरगाळून फेकला होता. मात्र अद्यापही लासूर स्टेशनला त्या दुकानदारांवर कलम 328 अन्वये गुन्हा दाखल झाला नाही. त्यानंतर वैजापूर,कन्नड येथील दुकानदारावर पोलिसांकरवी कलम 323,273 अन्वये किरकोळ गुन्हा दाखल आहे. हे दोन्ही गुन्हे जांमीनपत्र आहेत. वस्तुता त्या दुकानदारांनी भेसळ केल्याने त्यांच्यावर कलम 328 अन्वये गुन्हा दाखल होणे गरजेचे आहे. कारण हे व्यापारी सर्वसामान्य नागरिकांच्या जिवांशी खेळले आहेत. मात्र दुकानदार मोकाट सोडण्यामागे अन्न व औषध प्रशासन मेहेरबानी का करतय ?.असा प्रश्न नागरिकांतून उपस्थित केला जात आहे.

गंगापूर तालुक्यातील लासूर स्टेशन परिसरातील शिल्लेगाव, सिद्धनाथ वाडगाव,सावंगी,गोपाळवाडी, व इतर गावातील नागरिकांनी 26 सप्टेंबरला नवरात्री सुरु झाल्याने नवरात्रीचा उपवासासाठी भगरीचा भात व भगरीच्या भाकरी फराळासाठी खालल्या मात्र काही वेळातच त्यांना उलटी, मळमळ, पोट दुखणे,संडास असा त्रास होण्यास सुरुवात झाली म्हणुन नातलगाणी लासूर स्टेशन येथील सावंगी चौकात असणाऱ्या शिवना व स्पंदन या खासगी रुग्णालयात तब्ब्ल पंचवीस ते तीस रुग्ण दाखल केले होते त्यानंतर दुसऱ्या दिवशी म्हणजे 27 तारखेला पुन्हा लासूर स्टेशन येथील भगुरे कुटुंबंतील चार जणांना भगरीतुन विषबाधा झाल्याने शिवना हॉस्पिटल येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले होते यामध्ये लहान मुलाचाही समावेश होता या सर्वच्या सर्व म्हणजे भगरीतुन विषबाधा झालेल्या लासूर स्टेशन,महालगाव,बनशेंद्रा,कन्नड व वैजापूर तालुक्यातील .रुगणात एकच साम्य आहे ते म्हणजे या सर्व रुग्णांनी भगरीचे पिठापासून बनवलेले पदार्थ खाल्ले होते व , लासूर स्टे शन,शिल्लेगाव,गोपाळवाडी,सावंगी,कन्नड, बनशेंद्रा, वैजापूर येथील रुगणांकडून हस्तगत केलेल्या भगरीच्या पिठाचे पाकीटच्या पॅकिंग एकच आहेत त्यावर कुठल्याही प्रकारचा बॅचं नंबर,एक्स्पायारी डेट, मॅन्युफॅक्च्युरीग डेट यांचा उल्लेख नसून हे सर्व भगरीच्या पिठाची पॅकिंग लासूर स्टेशन येथील एका दुकानदाराने मागील वर्षीचे पीठ मजूरांकडून चाळणीने चालून यावर्षीचे व मागील वर्षीचे भगरीचे पीठ भेसळ करून पॅकिंग करून किरकोळ दुकानदाराला कुठलेही बिल न देता विक्री केलेले आहे या किरकोळ दुकानदारांनीही कुठलीही शहानिशा न करता ग्राहकांना विक्री केले त्यामुळे भगरीच्या पिठामुळे विषबाधा झाली असून जिल्हाभरात लासूर स्टेशन येथीलच दुकानदाराकडून खरेदी केल्याची चर्चा दबक्या आवाजात लासूर स्टेशन येथील नागरिकांत आहे त्यामुळे लासूर स्टेशन हेच लासूर स्टेशन जिल्ह्यातील भगरीच्या विषबाधेचे प्रमुख केंद्र आहे कीं काय ? अशी चर्चा जिल्हाभरात आहे मात्र अन्न भेसळ विभागाने वैजापूर, कन्नड व इतर ठिकाणाच्या किरकोळ काही कलम 328 अन्वये गुन्हे दाखल न करता दुकानदारावर पोलिसांकरवी किरकोळ गुन्हे दाखल केले आहेत जेणेकरून दुकानदारांची बडदास्त ठेवली जाईल याची काळजी अन्न औषध प्रशासनाने घेतली आहे. दरम्यान अन्न व औषध प्रशासनाने तात्काळ लासूर स्टेशन येथील विविध ठिकाणी उपचार घेत असलेल्या रुग्णाची विचारपूस करून नोंद करून घेऊन तीन दिवस उलटले तरी गुन्हा दाखल नाहीं या मधील बहुते रुग्णांनी दोन दुकानातून भगर व भगरीचे पीठ खरेदी केले असल्याचे सांगितले मात्र अद्यापही अन्न, औषध व भेसळ प्रशासन बोटचेपी भूमिका घेत असल्याचे दिसत असून यातील मुख्य दुकानदाराचे अर्थपूर्ण संबंध अन्न, औषध, भेसळ,विभागाच्या काही अधिकाऱ्याशी असल्याचे समजते त्यामुळे लासूर स्टेशनच्या दुकानदारावर गुन्हे दाखल करण्यास टाळाटाळ करत असल्याचे समजते.

लासूरला नागरिकांनी अन्न व औषध प्रशासन विभागाच्या अधिकाऱ्यांना रुग्णांनी धारेवर धरले होते यावेळी रुग्णांशी बोलताना पथकातील एका महिला अधिकाऱ्यांची जीभ घसरली होती व त्या बोलताना म्हणाल्या होत्या कीं काय खावे हे अजूनही लोकांना कळत नाही यामुळे मात्र उपस्थित रुग्णांच्या नातेवाईकांचा पारा चढला त्यानी सर्व उपस्थित अधिकाऱ्यांची चांगलीच कानउघडणी केली होती व तुम्ही घटना घडायच्या आगोदर तपासन्या का करत नाही असे सुनावले व तुम्ही काहीच करू शकत नाही असे म्हणून लिहिलेला पंचनामा एका रुग्णच्या नातेवाईकांने चूरगाळून फेकला त्यामुळे सामान्य नागरिकांत अन्न, औषध विभागाच्या कामकाजावर नाराज असून त्यांच्या अर्थपूर्ण संबधांची माहिती सर्वश्रुत आहे.

**भगर विकणाऱ्या दुकानदारांवर गुन्हे**

लासूर स्टेशन येथे तसेच परिसरात दुकानदारांनी निकृष्ट दर्जाची भगर व पीठ विक्री केली होती. त्यामुळे २५ ते ३० लोकांना विष बाधा होऊन शिवना तसेच इतर दवाखान्यात दाखल करण्यात आले होते. सदर प्रकरणांत भगर विक्रेते १) विशाल लोढा २) संतोष लोढा ३) गोपाळ पांडव ४) संदीप कदम यांचे विरुद्ध विविध कलम अन्वये पोलिस स्टेश शिल्लेगाव येथे गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास चालू आहे.



# शेती व ग्रामीण जीवनाशी नाळ कायम राहिली तरच भविष्य

## प्रवीण तरडे : इर्जिक फाउंडेशनच्या पहिल्या मानांकित विक्री केंद्राचे उद्‌घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** शेती, शेतकरी आणि ग्रामीण जीवनाशी नाळ जोडलेली राहिली तरच समाजाला भविष्य आहे. त्यामुळे शेतकरी उत्पादक, विक्रेते आणि ग्राहक या तिन्ही घटकांना एका सूत्रामध्ये बांधणाऱ्या इर्जिक फाउंडेशनचे काम समाजासाठी गरजेचे आणि कौतुकास्पद आहे, असे उद्‌गार प्रसिद्ध चित्रपट अभिनेते आणि दिग्दर्शक प्रवीण तरडे यांनी काढले. रास्त भाव, शाश्वत दर्जा आणि नियमित पुरवठा या त्रिसूत्रीवर आधारित विक्री व्यवस्था पुणे, मुंबई आणि नाशिक येथे इर्जिक फाउंडेशनने सुरू केली आहे. त्याचाच एक भाग म्हणून सूस येथील गणेश सुपर मार्केट या इर्जिक मानांकित विक्री केंद्राचे लोकार्पण तरडे यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते. राज्याचे साखर आयुक्त शेखर गायकवाड हे कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे होते, तर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पुणे महानगर संघचालक रवींद्र वंजारवाडकर, भारतीय किसान संघाचे चंदन पाटील आणि इर्जिक फाउंडेशनचे संचालक किशोर निर्मल, अजित फाटके, देवानंद लोंढे, निवृत्त कमांडर जयंत कोंदे, महाव्यवस्थापक गिरीश निंबाळकर यांची प्रमुख उपस्थिती होती. ग्राहकांच्या हिताच्या रक्षणासाठी शेतकऱ्यांनी दर्जेदार मालाचे उत्पादन करावी त्यावर प्रक्रिया करावी असे आवाहन करतानाच माझ्या आगामी चित्रपटांमध्ये मी हा विषय आवर्जून मांडणार आहे, असे प्रवीण तरडे म्हणाले. साखर आयुक्त शेखर गायकवाड यांनी मार्गदर्शन करताना शेती क्षेत्रामध्ये नवीन तंत्रज्ञान वापरून एकत्र येण्यावर भर देण्याची अपेक्षा व्यक्त केली. आपल्या प्रशासकीय कारकिर्दीमध्ये राज्याच्या विविध भागांमध्ये केलेल्या यशस्वी प्रयोगांचा त्यांनी उल्लेख केला शासनाच्या योजना आणि अधिकारी हे नेहमीच शेतकऱ्यांच्या हिताची निर्णय घेत असतात, त्यामुळे शासन आणि शेतकरी यांच्यामध्ये सुसंवाद राहण्याची गरज त्यांनी प्रतिपादित केली. याप्रसंगी प्रतीकात्मक स्वरूपात शेतकरी उत्पादक निरंजन अनेगिरिकर, विक्रेते संतोष सुतार आणि ग्राहक सुजाता मोरे यांनी आपली मनोगते व्यक्त केली. डॉ. भारत करडक यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तर फाउंडेशनचे संचालक किशोर निर्मळ यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. पुण्यात 50 दुकानांना ईर्जिक मानांकित करण्याचे नियोजन सध्या ईर्जिकसोबत 4 शेतकरी उत्पादक कंपनी काम करत आहेत. शेतकऱ्यांसोबतच ग्रामीण कारागीर, हस्त कलाकार उदा. चर्मकार, कुंभार, बांबू कारागीर इ. यांनाही सर्व प्रकारची मदत व त्यांच्या शाश्वत उपजिविकेची हमी इर्जिकमध्ये असणार आहे. पुणे शहरात एकूण ५० दुकांनाना ईर्जिक मानांकित करण्याचे नियोजन आहे. तसेच, अधिकाधिक घरी वस्तू पोहोच मिळण्याची व्यवस्था होणार आहे. मोबाईल व इंटरनेट द्वारे वस्तू नोंदणी व खरेदी, विक्रीसाठी वस्तूंची नोंदणी तसेच सेवांची नोंदणी उदा. वाहतूक व्यवस्था या व्यवस्था प्रारंभ होत आहेत, अशी माहिती महाव्यवस्थापक गिरीश निंबाळकर यांनी दिली.

# मराठा जागर परिषदेचे अध्यक्ष प्रा. संभाजी पाटील यांचा सहकाऱ्यांसह भाजप प्रवेश



आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** मराठा जागर परिषद या संघटनेचे अध्यक्ष व युवा प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य या संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. संभाजी दादाराव पाटील यांनी त्यांच्या सहकाऱ्यांसह बुधवारी भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला. प्रदेशाध्यक्ष मा. चंद्रशेखर बावनकुळे यांनी त्यांचे व त्यांच्या सहकाऱ्यांचे पक्षात स्वागत केले. मुंबईत भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या या पक्ष प्रवेशाच्या वेळी हिंगोली जिल्हाध्यक्ष मा. रामराव वडकुते, आ. तान्हाजी मुटकुळे व माजी खासदार शिवाजी माने उपस्थित होते. प्रा. संभाजी पाटील यांनी मराठा क्रांती मोर्चाच्या आंदोलनाच्या काळात मराठा समाजातील तरुणांमध्ये जागृती करण्यासाठी राज्यभर दुचाकी, चारचाकी वाहन यात्रा केल्या होत्या. त्यांनी मराठा आरक्षण, सारथी संस्था, वसतीगृहे या प्रश्नांसाठी उपोषण केले होते. प्रा. पाटील यांच्यासह त्यांच्या संघटनेतील पदाधिकाऱ्यांनी आणि राज्यभरातील युवा कार्यकर्त्यांनी यावेळी भाजपामध्ये प्रवेश केला.




# एक लाख किमतीच्या दागिन्यांची चोरी

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** खामगाव शहरातील बालाजी प्लॉट परिसरातील सती ज्वेलर्स या दुकानातून एक लाख किमतीच्या दागिन्यांची चोरी झाली आहे. दोन इसमांनी दागिने खरेदीचा बनाव करत ही चोरी केली आहे. विशेष म्हणजे महिला दुकानदाराच्या उपस्थितीत ही चोरी झाली असून चोरीची घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली आहे. पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत. मिळालेल्या माहितीनुसार बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव येथे एका सोन्याच्या दुकानात चोरी करण्यात आली. चोरट्यांनी साधारण एक लाख किमतीचे सोने या दुकानातून लांबवले आहे.

महिला दुकानदाराला सोन्याचे आणखी दागिने दाखवा असे सांगून, संधी संधी मिळताच चोरट्यांनी दागिन्यांवर हात मारला आहे. सदर घटना सीसीटीव्हीमध्ये कैद झाली असून दुकानाच्या मालक तथा तक्रारदार निर्मला दिनेश वर्मा यांच्या तक्रारीवरून खामगाव शहर पोलिसात या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# नाना पटोलेंचा वार

आधुनिक केसरी

शाहु, फुले, आंबेडकरांच्या महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री स्वतःच मोदी-शाह यांचे हस्तक असल्याचे जाहीरपणे सांगतात. महाराष्ट्रातील उद्योगधंदे व गुंतवणूक गुजरातमध्ये पाठवली जात आहे. आता तर महाराष्ट्राचे दोन मंत्री गुजरातमध्ये जाऊन आले. महाराष्ट्रातील उद्योग गुजरातमध्ये कसे पाठवायचे याचा अभ्यास करायला ते गेले होते काय ? असा सवाल महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी विचारला आहे. यासंदर्भात पत्रकारांशी बोलताना नाना पटोले पुढे म्हणाले की, राज्यातील शिंदे-फडणवीस सरकार हे दिल्लीच्या इशाऱ्यावर काम करत आहे, दिल्लीला विचारल्याशिवाय ते कोणताच निर्णय घेऊ शकत नाहीत. त्यामुळे सारख्या दिल्ली वाऱ्या कराव्या लागतात हे महाराष्ट्राचे दुर्दैव आहे. राज्यातील ईडीचे सरकार असंवैधानिक आहे हे आम्ही सुरुवातीपासूनच सांगत आहोत. दुसरीकडे महागाईने जनता त्रस्त आहे. मध्यमवर्गही महागाईने पिचला आहे पण केंद्र सरकार आपली जबाबदारी झटकत आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सितारमण या महागाई राज्य सरकारने कमी करावी असे म्हणत आहेत. महाराष्ट्रातील सध्याचे सरकार दिल्लीच्या इशाऱ्यावर काम करत आहे त्यामुळे निर्मला सितारमण यांनी सांगितल्याप्रमाणे महागाई कमी करण्यासाठी ते काय करतात ते पहावे लागेल. शिंदे-फडणवीस सरकारने तीन महिन्यानंतर पालकमंत्र्यांच्या नियुक्त्या जाहीर केल्या आहेत. सर्वात गंभीर बाब म्हणजे सहा जिल्ह्याला एकच पालकमंत्री दिला आहे. हा पालकमंत्री काय स्पायडरमॅन आहे का? सहा जिल्ह्याच्या विकास कामांसाठी ते वेळ कसा देणार ? या दोघांच्या वादात जिल्ह्यातील विकासकामांचा बोजवारा उडाला आहे. आधीच या सरकारने मंजूर विकास कामांना स्थगिती दिलेली आहे. राज्यातील अनेक जिल्ह्यातील रस्ते अत्यंत खराब आहेत. रस्त्यात खड्डे आहेत, का खड्ड्यात रस्ते, हेच कळत नाही. अतिवृष्टीने शेतकऱ्याचे प्रचंड मोठे नुकसान झाले, सोयाबिन गेले, भाजीपाला, फळबागा, सर्व काही वाया गेले असतानाही पंचनामे व्यवस्थित केलेले नाहीत. अमरावती, अकोला, यासह राज्याच्या अनेक जिल्ह्यातील परिस्थिती मी पाहिली पण सरकारची उदासिनता दिसून येते. शेतकऱ्यांना अजून मदत मिळालेले नाही. राज्यातील ईडी सरकार शेतकरी विरोधी आहे हे त्यांच्या कृतीतून दिसत आहे. काँग्रेस नेते खा. राहुलजी गांधी यांच्या नेतृत्वाखाली सुरु असलेल्या भारत जोडो पदयात्रेला मोठा प्रतिसाद मिळत आहे. महाराष्ट्राच्या ज्या जिल्ह्यातील ही पदयात्रा जाणार आहे, त्या भागातूनही मोठ्या संख्येने लोक या पदयात्रेत सहभागी होणार आहेत. डावे पक्ष, सामाजिक संघटना यांनी पदयात्रेला पाठिंबा दिल्याचे जाहीर केलेले आहे.

# लाचार शागिर्द आणि त्याची पोपटपंची !



रवींद्र मुळे
संपर्क क्र : ९४२२२२१५७०

आधुनिक केसरी

काल किंवा परवा या परंपरेतील एका शागिर्दाने स्वतःच्या मालकाच्या उपस्थितीत थेट माँ सरस्वती, माँ शारदा याना दिलेले आव्हान ! विद्येच्या पवित्र परिसरात सरस्वतीची आराधना करण्याची आमची परंपरा आहे. ज्ञानार्जन करताना अधिष्ठान असेल तर ते ज्ञान समाजपयोगी, सकारात्मक आणि विधायक असते अशी या सरस्वती उपासनेच्या मागची धारणा आहे आणि त्यामुळे सरस्वती उपासना हा आमच्या ज्ञानमार्गातील अविभाज्य भाग आहे. पण ज्यांच्या मालकांना देवाचा बाप झाल्याचा अहंगंड झाला आहे त्यांच्या लाचार सेवकांना माँ सरस्वती देवी किंवा माँ शारदा यांची लक्तरे काढण्याची आणि त्या निमित्ताने आपली स्वामिनिष्ठा दाखवण्याची संधी मिळाली आणि त्यांनी ती इमाने इतबारे उपयोगात आणली.

काही माणसांकडे काहीच भांडवल नसते तेव्हा एक गोष्ट असते ती म्हणजे लाचारी आणि आपल्या मालकाला खुश ठेवण्याची खूषमस्करी ! अशी लाचार माणसे मालक बदलला की विचार पण बेमालूमपणे बदलतात आणि मग आपल्याला प्रश्न पडतो HMV च्या रेकॉर्डवर His mastar voice प्रतीक दाखवणारा माणूस किती कल्पक असावा ! अन्यथा एकेकाळी बाळासाहेबांचा कट्टर हिंदुत्ववादी शिवसैनिक म्हणवणाऱ्या महाराष्ट्रातील विदूषकाचे वाक्ताडन आपल्याला ऐकावे लागले नसते ! या लाचारीच्या बदल्यात याना काय मिळते? हा जर प्रश्न पडत असेल तर? त्याचे उत्तर आहे सत्ता आणि पैसा ! या दोन्ही गोष्टी औटघटकेच्या असल्या तरी त्यांचे जीवन तत्वज्ञान चार्वाकाने वर्णन केल्या प्रमाणे उपभोगवादी तत्वज्ञानाला धरून असते त्यामुळे सत्ता आणि पैसा या साठी आपण काय बरळतो याचे पण त्यांना भान नसते ! चार्वाक यांनी मांडलेले तत्वज्ञान निदान त्या विचाराशी ते एकनिष्ठ राहिल्याने त्यांना दार्शनिक पुरुषाचे स्थान तरी मिळाले ! या मंडळीत तितकी पण विचार निष्ठा नाही हे येथे लक्षात घ्यावे लागेल.

श्रद्धांना अंधश्रद्धा ठरवत, आपल्या अनैतिक कृत्यांचे निर्लज्ज समर्थन करण्यासाठी नास्तिक वादाचा आव आणून सतत भूमिका बदलणारे हे आजकालचे विदूषकी माणसे म्हणजे व्यक्तिगत स्वार्थाचे प्रदर्शन करताना तत्वज्ञानाचे आव आणणारे घृणास्पद पोपटपंची करणारे सत्तेच्या पिंजऱ्यातील पोपट आहेत.

ही मंडळी आपल्या राजकीय स्वार्थासाठी महापुरुषांचा जमेल तसा वापर करतात ! जातीच्या चौकटीत बंदिस्त करतात आणि त्यांचे फोटो लावून निर्लज्जपणे मतांचा व्यापार करत असतात. आपल्या ह्या विकृत खेळातून भावी पिढ्यांचे आपण किती नुकसान करत आहोत याची याना किंचित ही जाणीव नसते. याना समोर दिसत असतो फक्त स्वार्थ, राजकारण, सत्ता आणि पैसा !

हे सगळे सांगण्याचे कारण काल किंवा परवा या परंपरेतील एका शागिर्दाने स्वतःच्या मालकाच्या उपस्थितीत थेट माँ सरस्वती, माँ शारदा याना दिलेले आव्हान ! विद्येच्या पवित्र परिसरात सरस्वतीची आराधना करण्याची आमची परंपरा आहे. ज्ञानार्जन करताना अधिष्ठान असेल तर ते ज्ञान समाजपयोगी, सकारात्मक आणि विधायक असते अशी या सरस्वती उपासनेच्या मागची धारणा आहे आणि त्यामुळे सरस्वती उपासना हा आमच्या ज्ञानमार्गातील अविभाज्य भाग आहे. पण ज्यांच्या मालकांना देवाचा बाप झाल्याचा अहंगंड झाला आहे त्यांच्या लाचार सेवकांना माँ सरस्वती देवी किंवा माँ शारदा यांची लक्तरे काढण्याची आणि त्या निमित्ताने आपली स्वामिनिष्ठा दाखवण्याची संधी मिळाली आणि त्यांनी ती इमाने इतबारे उपयोगात आणली. आणली तर आणली पण त्यात कर्मवीर भाऊराव पाटील, संत गाडगे बाबा किंवा महात्मा ज्योतिबा आणि सावित्रीबाई फुले यांची नावे घेत महाराष्ट्रात पुन्हा एकदा जाती जातीतील आपल्या भांडणे लावून वणवा पेटवण्याची केविलवाणी धडपड केल्याचे दिसून येते. सुदैवाने महाराष्ट्र आता यांचा कावा यशस्वी होऊ देणार नाही अशी आपण आशा करू या !

स्वतः सावित्रीबाई फुले यांनी आपल्या काव्यसंग्रहात ज्या सरस्वती मातेचा अत्यंत आदराने उल्लेख केला आहे तो उल्लेख सोयीस्करपणे विसरून समाजाला भ्रमित करण्याचे उद्योग यांचे काही थांबताना दिसत नाहित हे दुर्दैव आहे.

स्वतःच्या मोठमोठ्या शिक्षणसंस्था काढून महाराष्ट्रात शिक्षणाचा व्यापार मांडलेले हे सगळे शिक्षण सम्राट ! रयत शिक्षण संस्थेत घुसखोरी करून त्याचा राजकीय फायदा उठवणारी ही मंडळी, कर्मवीर भाऊराव यांचे नाव निर्लज्जपणे घेत राहतात !



घुटका आणि तंबाखूच्या पिचकार्यांनी आजूबाजूची वसुंधरा घाण करून आपल्या अनुयायांना तसल्याच सवयी लावणारे हे महाभाग संत गाडगेबाबा यांचे नाव घेत राहणार ! जाती / पातीत भांडणे लावून , अठरा पगड जातीत संघर्ष निर्माण करणारे ही राजकीय गिधाडे छत्रपती शाहू महाराज यांचे फोटो लावा असे म्हणताना स्वतःची पापे विसरून जाणार ! कधी आडणाववरून, कधीं पगडी वरून, कधीं भाषेची नक्कल करून एक जात दुसऱ्या जातीवर कशी तुटून पडेल याची वाट बघणारे नेहमीच टक्केवारीची भाषा बोलत आले आहेत कारण यांचे आयुष्य टक्केवारी खाण्या पलीकडे कधी गेलेच नाही.

आपली भ्रष्टाचाराची पापे झाकण्यासाठी जातीचा उपयोग चिलखतासारखे करणारे ही मंडळी ! त्यांना आता सरस्वती देवीची भीती वाटायला लागली आहे. म्हणून आता थेट त्यावर वार करू पाहत आहेत.

आशा प्रकारे सरस्वतीची विटम्बना त्यांचा तात्कालिक कंड जरी भागवणार असले तरी उद्याच्या सामाजिक अधःपतनास तेच जबाबदार असतील यात शंका नाही. एकीकडे विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या आधारावर प्रगतीच्या नावाखाली होत असलेली माणसाची अघोरी वाटचाल रोखण्याचे आव्हान समस्त विचारी समुदायकडे असताना ज्या परंपरा, संस्कृती आणि विचार दर्शनात त्याचे उत्तर आहे त्यालाच छिन्न विच्छिन्न करण्याचे पाप जे महाभाग करत आहेत ते कितीही आज सत्ता आणि पैशाच्या मस्तीत लोळत असले तरी येणारा काळ त्यांना माफ करणार नाही.

या सगळ्यात एकच प्रश्न उरतो जाती, पक्ष आणि प्रांत या संकुचित सीमा ओलांडून, भेदून महापुरुषांना स्वीकारणार की नाही? जर ते स्वीकारले तरच आम्ही हा महापुरुषांचा व्यापार करणारे बदमाश मंडळींना धडा शिकवू शकू आणि आमच्या जाजवल्य, शुद्ध, सात्विक प्रेरणा टिकवू शकू अन्यथा समाजाला पुढे जे भोगावे लागेल ते त्यांचे प्राक्तन असेल !

# आत्मनिर्भर भारताचे 'हे' विदारक चित्र



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे पूर्ण झालीत मात्र अतिदुर्गम भागात रस्ते, वीज, पाणी आणि आरोग्य या सारख्या प्राथमिक सुविधांचा स्वातंत्र्याच्या ७५ वर्षानंतरही वानवा असल्याचे या घटनेनंतर पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. चांगले रस्ते आणि आरोग्य सेवा नसल्याने येथील नागरिकांना डोलीकरुन पायपीट करत दवाखाना गाठावा लागतो. त्यात वेळेत आरोग्य सेवा न मिळाल्याने अनेकांना प्राण गमवावे लागत आहे.हे चित्र अतिशय विदारक आहे शासन व प्रशासनाने आता तरी पायाभूत व मूलभूत सुविधा निर्माण करून जनतेला दिलासा देण्याची गरज आहे.

देशाला स्वातंत्र्य होऊन ७५ वर्षे पूर्ण झाली आहेत, मात्र आम्ही आजही ग्रामीण भागासह डोंगराळ व दुर्गम भागात मूलभूत सेवा निर्माण करू शकलो नाही. शिक्षण,आरोग्य,वैसकीय सेवा,पायाभूत सुविधा या भागात निर्माण करण्यात शासन व प्रशासनाला अपयश आले आहे. सुविधां अभावी ग्रामीण व दुर्गम भागात राहणाऱ्या लोकांना आरोग्यासह अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत असून आरोग्य सुविधां अभावी अनेक महिलांना व रुग्णांना प्रसूती दरम्यान जीव लगमवावा लागत आहे.

प्राथमिक सुविधांची वानवा असल्यामुळे भिवंडीत एका गरोदर महिलेच्या बाळाचा प्रसुतीदरम्यान मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना घडली आहे. भिवंडी येथील दिघाशी गावातील धर्मीचा पाडा येथे मुख्य रस्त्यापर्यंत येण्यासाठी रस्ता नसल्यामुळे हा प्रकार घडला आहे. दर्शना फेरले असं या महिलेचं नाव असून सुविधांच्या अभावामुळे त्यांना त्यांच्या बाळाला गमवावे लागले आहे.

एकीकडे भारत आत्मनिर्भर होत असतानाचं हे चित्र देशात बघायला मिळत आहे.आत्मनिर्भर भारतात प्राथमिक सुविधां अभावी बाळंतीण महिलेला झोळीतून घेऊन जावं लागतं .भिवंडीतील ही एकमेव घटना घडली असं नसून धडगाव तालुक्यात देखील भिवंडीच्या घटनेची पुनरावृत्ती घडल्याची बातमी समोर आली भिवंडीच्या. कुवरखेत या गावाला रस्ताच नाही. येथील एका महिलेला प्रसुतीसाठी रुग्णालयात नेण्यासाठी झोळीचा वापर करण्यात आले आहे. झोळीतून रुग्णालयात घेऊन जात असताना या मातेने बाळाला झोळीतच जन्म दिला आहे.

धडगाव तालुक्यातील कुवरखेत येथील रहिवासी हिरा भाईदास वळवी यांना प्रसूतीसाठी नातेवाईकांनी धडगाव ग्रामीण रुग्णालयापर्यंत आणण्यासाठी रस्ता नसल्याने दोन किलोमीटर झोळीतून घेऊन आणतांना मातेने रस्त्यातच बाळाला जन्म दिला आहे.

हृदय हेलावणारी मन सुन्न करणारी परिस्थिती पाहता. धडगाव १०८ रुग्णवाहिकेचे डॉक्टर राकेश तडवी, पायलट कुंदन वळवी, संतोष पावरा यांनी झोळीतून आणताना रस्त्यातच प्रसूती झालेल्या मातेला सुखरूप आणण्यासाठी. गाडी जिथपर्यंत जाईल तिथेपर्यंत ॲम्बुलन्स नेण्याचा प्रयत्न करत. वैद्यकीय सेवा देऊन बाळाला व मातेला वीस किलोमीटर धडगाव ग्रामीण रुग्णालयात पुढील उपचारासाठी दाखल केले. १०८ रुग्णवाहिकेचे डॉक्टर व पायलट यांनी तात्पुरता दाखवून मातेला व बाळाला दिलेली आरोग्य सेवा कौतुकास्पद आहे.मात्र अद्यापही दुर्गम भागात रस्ते नसल्याने गरोदर मातांना व आजारी रुग्णांना झोळी करून रुग्णालयापर्यंत पोहोचवावे लागत आहे. ही सरकार व प्रशासनासाठी मोठी दुर्दैवाची बाब आहे. कोट्यवधींचे रस्ते कागदोपत्री तयार करून भ्रष्टाचार केला जातो. त्यामुळे इथल्या नागरिकांवर अशी वेळ येत आहे.

गरोदर मातेला झोळी करून रुग्णालयापर्यंत पोहोचण्यासाठी मोठी कसरत करावी लागेल.

देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे पूर्ण झालीत मात्र अतिदुर्गम भागात रस्ते, वीज, पाणी आणि आरोग्य या सारख्या प्राथमिक सुविधांचा स्वातंत्र्याच्या ७५ वर्षानंतरही वानवा असल्याचे या घटनेनंतर पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. चांगले रस्ते आणि आरोग्य सेवा नसल्याने येथील नागरिकांना डोलीकरुन पायपीट करत दवाखाना गाठावा लागतो. त्यात वेळेत आरोग्य सेवा न मिळाल्याने अनेकांना प्राण गमवावे लागत आहे.हे चित्र अतिशय विदारक आहे शासन व प्रशासनाने आता तरी पायाभूत व मूलभूत सुविधा निर्माण करून जनतेला दिलासा देण्याची गरज आहे.

# श्रमाची कदर नसलेला देश

आधुनिक केसरी

नितीन सावंत, परभणी
संपर्क क्र. 9970744142

नुकताच आम्ही पुर्णा तालुक्यातील सातेफळच्या कुंभार वस्तीला भेट दिली.सोबत होते महाराष्ट्र सरकारच्या मानव विकासचे आयुक्त मा.नितीन पाटील आणि त्यांचे इतर आधिकारी. विकासाच्या प्रक्रियेत न आलेल्या गरिब जाती जमातींसाठी काम करणारे हे आधिकारी कुंभार वस्तीत कुंभारकाम बघत होते.कुंभारकाम करणाऱ्या सर्व व्यावसाईकांना कशाप्रकारे मदत करता येइल जेणेकरून त्यांच्या व्यावसायात वृद्धी बरोबर नफाही जास्त कमावता येइल यासाठी सर्व आधिकारी आधिक माहिती देत होते.त्यांच्याकडील काही महत्वपूर्ण योजनाही सांगत होते.तशी चर्चाही करत होते. मी अंगणात बसलेल्या एक दोन वृद्धांसोबत चर्चा करायला सुरुवात केली.बाजुला काही मडके वाळवत घातलेले होते.नवरात्रोत्सव जवळ आल्याने घटस्थापनेसाठी लागणारे ते छोटे आकाराचे गाडगे बनवले होते. मी म्हनालो "कितीला एक जाते हे मडके"

वृद्ध आज्जोबा म्हनाले "पाच रुपायाला एक" मी आवाक झालो फक्त पाच रुपये किंमत. हल्ली काय येतेय हो पाच रुपायाला? मी परत प्रश्न केला "यासाठी वेळ किती जातो, एक मडके बनवायला?"

ते म्हनाले "माती भिजवने, मुरवने, चिखल घट्ट करणे ही चार पाच दिवसाची मोठी प्रक्रिया आहे. "एक गाडग्याच्या चिखलाला आकार द्यायला विचारत असाल तर आर्धा तास जातो." आर्ध्या तासाच्या श्रमाचे फक्त पाच रुपये?

ते म्हनाले " तिनशे मडके बमवायला सहा दिवस गेलेत.म्हणजे एका दिवसात ५० मडके बनवलीत.एक पाच रुपाला विकले जाते याप्रमाणे आम्हाला २५० रुपये रोज पडतो. मी म्हनालो "ही तर घोर निंदा आहे तुमच्या श्रमाची आणि कलेची." ते म्हनाले "साहेब या वंशाला घातलेय म्हणून करावे लागते बघा. नाहीतर कुनाला हौस आहे चिखल तुडवायची. आम्हाला पर्याय आहे का दुसरा काही, नाही ना. म्हणून हे सर्व. लोक भाव पाडून मागत्यात, उलटे रेटुन बोलतात. बरोबर वागणूक देत नाहीत. आमचे आम्हालाच माहिती आम्ही कसे जगतो ते.

"मी सिरिअस होतो आहे , हे लक्षात आल्यानंतर त्यांनी दुखातूनही हस्याची कमाई केलेली कला दाखवली.एक म्हातारा दुसऱ्या म्हाताऱ्याला म्हणाला "चोरी केली असती. पण आम्हाला करता येत नाही.आणि मार खाण्याजोगी तब्यतही नाही"

आम्ही सगळेचजन असलो. तेवढ्या आपार मेहनतीतूनही ही मानसे आनंदी, सुखी रहातात.एकोप्याने रहातात.हसतात.दुख पोटात दाबुन ठेवतात.हजारो वर्षापासून अन्न खायला भांडी बनवून देनारा कुंभार आज व्यावसायाच्या रुपाने शेवटच्या घटका मोजत आहे.पाच रुपायासाठी तो चिखलाने हात भरवतो .तरी तो आनंदी रहातो. आणि इकडे नोकरदार वर्गाचा दोन महिने पगार नाही झाला तर बिपी वाढतो.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
TITLE CODE -MAHMAR51117, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
TITLE CODE -MAHMAR51117, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# अक्षय प्रेमाचे मागणे मागणारी कविता...



वर्षा मारुती भिसे, मुंबई

आधुनिक केसरी

आपल्या `प्रेम उठाव` या काव्यसंग्रहाबद्दल सांगताना कवी नवनाथ रणखांबे यांनी त्यांच्या मनोगतात म्हटले आहे की, “माझ्या लेखणीने कवितेत उठाव केला आहे. कविता हे माझ्यासाठी अन्यायाविरुद्ध आवाज उठवणारे एक शस्त्र आहे.” त्यांच्या या उद्गाराप्रमाणेच या संग्रहातील प्रत्येक कविता प्रेमाचा उठाव करणारी आहे. कविने उठाव केला आहे पण तो प्रेमासाठी. आजपर्यंत अनेकांनी उठाव केले अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी, न्याय मागण्यासाठी परंतु आजुबाजूच्या निष्ठूर समाजात जेव्हा प्रेम ही भावनाच संपत चाललेली दिसते तेव्हा या जगात प्रेमाची प्रतिष्ठापना पुन्हा एकदा व्हावी यासाठी कवी नवनाथ रणखांबे यांनी हा प्रेमाचा उठाव केला आहे.

`प्रेमाला उपमा नाही` असं कुणीतरी म्हटलं आहे, आणि त्याचाच प्रत्यय देणारा हदयस्पर्शी अनुभव म्हणजे कवी नवनाथ रणखांबे यांचा `प्रेम उठाव`` हा काव्यसंग्रह ! समाजामध्ये आपल्या आसपास भावनाशून्य रुक्ष वातावरण असताना हिंसा, वैरभाव, द्वेश, आणि कलहाने नापिक होत चाललेल्या समाजमनाची मशागत करुन आणि आपल्या संवेदनशील काव्यरुपी सकस बिजाची पेरणी करुन फुलवलेली ही प्रेमफुलांची बाग म्हणजेच कवी नवनाथ रणखांबे यांचा `प्रेम उठाव` हा काव्यसंग्रह आहे.

आपल्या `प्रेम उठाव` या काव्यसंग्रहाबद्दल सांगताना कवी नवनाथ रणखांबे यांनी त्यांच्या मनोगतात म्हटले आहे की, “माझ्या लेखणीने कवितेत उठाव केला आहे. कविता हे माझ्यासाठी अन्यायाविरुद्ध आवाज उठवणारे एक शस्त्र आहे.” त्यांच्या या उद्‌गाराप्रमाणेच या संग्रहातील प्रत्येक कविता प्रेमाचा उठाव करणारी आहे. कविने उठाव केला आहे पण तो प्रेमासाठी. आजपर्यंत अनेकांनी उठाव केले अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी, न्याय मागण्यासाठी परंतु आजुबाजूच्या निष्ठूर समाजात जेव्हा प्रेम ही भावनाच संपत चाललेली दिसते तेव्हा या जगात प्रेमाची प्रतिष्ठापना पुन्हा एकदा व्हावी यासाठी कवी नवनाथ रणखांबे यांनी हा प्रेमाचा उठाव केला आहे. खरंतर प्रेम ही तशी नाजूक भावना आहे आणि ती नाजूकपणेच व्यक्त व्हायला हवी हे जरी खरे असले तरी प्रेमाची जागा वैरात घेतलेल्या समाजाला हा प्रेमातला नाजुकपणा कुठेतरी उमगेनासा झाला आहे आणि म्हणूनच कवीला हा उठाव करावा लागला आहे. कवी म्हणतो “क्रांती हा कळस असला तरी त्याचा पाया हा उठाव असतो.” कविला अभिप्रेत असलेली क्रांती त्याच्या उठावानेच घडू शकते यावर त्याचा ठाम विश्वास आहे.

असा हा प्रेमाचा उठाव करणारे कवीचे संवेदनशील मन अनेक माणसांना प्रेमाने जोडत आहे.

कवीचा लोकसंग्रह आणि त्यांना प्रेमाच्या ऋणात त्याने कसे बांधून ठेवले आहे हे या संग्रहातील ऋणनिर्देशनाच्या यादीतूनच स्पष्टपणे दिसून येते. प्रेम आणि स्नेहाशिवाय हे अशक्य असते. आणि म्हणूनच कवीने या संग्रहाची अर्पणपत्रिका “माझ्यावर जीवापाड प्रेम करणाऱ्यांना” या शब्दांत व्यक्त केली आहे.

`जे न देखे रवी, ते देखे कवी` असं म्हटल्याप्रमाणे मानवी नात्यातल्या प्रत्येक भावनेत कवी नवनाथ रणखांबे यांना प्रेमच प्रेम दिसत आहे. कविता लिहिताना त्यांनी अक्षरगणवृत्त, चारोळी, गीत, गजल, या काव्यप्रकारांचा सुंदर प्रयोग केलेला आहे. कवी नवनाथ रणखांबे यांच्या लेखणीतील शब्दांचे खरे सामर्थ्य त्यांच्याच समर्पक ओळीतून व्यक्त झाले आहे.

दुःख माझे बोलके झाले जरासे
भावना जेव्हा खरी शब्दात होती...

कवी नवनाथ रणखांबे यांनी आपल्या जीवनात जरी दुःखाचा उन्हाळा अनुभवला असला तरी ते निराश होत नाहीत. सुख देणारा वसंत त्यांना हवाहवासा वाटतो म्हणूनच आपल्या एका चारोळीतून व्यक्त होताना ते म्हणतात...

गळू गळून गेला
दुःखाला घेऊन
वसंत पालवित आला
सुखाला घेऊन...

सर्वांच्या सुखाची अपेक्षा करणाऱ्या या कवीला स्त्री वेदनेचीही जाणीव आहे. म्हणूनच आपल्या साखळदंड या कवितेत तो म्हणतो...

आयुष्य वाकलय बायपणाचे दुःमय वाट झेलून
जीवनभर विषम कवडिमोल स्त्रीत्वाचे जीवन
....त्याचा बळी मी एक स्त्री..

कवी नवनाथ रणखांबे यांचे आपल्या आईवर जीवापाड प्रेम आहे. काबाडकष्ट, मोलमजूरी करणाऱ्या तरीही खंबीरपणे परिस्थितीशी लढणाऱ्या आईबद्दल कवी म्हणतो...

खंबीर लढताना माय
तुला मी पाहिलय माय
तुला मी पाहिलय माय
स्वप्न फुलवतांना माय...

कवीला भविष्याची स्वप्ने देणारी आणि आयुष्याकडे आशावादी दृष्टिकोनातून पाहणारी ही माय म्हणूनच श्रेष्ठ ठरते.

या काव्यसंग्रहात उणिव, टाकू नको डाव फसवा, प्रीत, बेधुंद, पाऊस, उदास हात, मन, टाकलं ठरवून अशा प्रेमाविषयी वेगवेगळ्या भावना व्यक्त करणाऱ्या अनेक कविता विखुरल्या आहेत. या प्रत्येक कवितेत कवी नवनाथ रणखांबे यांनी प्रेम या संकल्पनेला पुन्हा पुन्हा दुजोरा दिला आहे. आपल्या एका कवितेत प्रेमाचं नातं कसं असतं हे सांगताना कवी म्हणतो...




प्रेम संपले की,
नाते तुटते !
प्रेम टिकले की,
नाते जुळते.....!

कवी नवनाथ रणखांबे यांनी आपल्या जगण्याला `झोका` हे समर्पक रुपक वापरुन या जीवनरुपी झोक्याला एका वेगळयाच उंचीवर नेले आहे.

जगण्याचा झोका
खाली वर येतो
जीवनाला माझ्या
धडा देवून जातो...

कवी नवनाथ रणखांबे यांच्या कवितेचा स्थायीभाव `प्रेम` हा असला तरी हाती घेतलेल्या नीळया निशाणावरही त्यांचे विशेष प्रेम आहे. दलित पिडीत समाजाचे उत्थान करुन त्याला जगण्याचा नवा अर्थ देणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांविषयी त्यांना अत्यंत आदर आहे. हाच आदर व्यक्त करताना ते `निळे निशाण` या कवितेत म्हणतात...

उद्धारलेस आम्हा शिक्षण दिलेस जेव्हा
आता जगात आम्हा त्यानेच मान आहे
केले समान सर्वा मिटवून भेद सारे
तू संविधान लिहिले सारेच छान आहे

आपली भारतीय मूल्यव्यवस्था संविधानाच्या बळकट खांदयावर सुरक्षित आहे म्हणूनच जिथे संविधान आहे तिथे सारेच छान आहे असे कवी म्हणतो.

कवी नवनाथ रणखांबे यांचा समतेवर विश्वास आहे आणि म्हणूनच ते उठाव या आपल्या कवितेत म्हणतात...

प्रकाशदात्या, माणसांच्या अंधाराला संपवून टाक
सृष्टिमध्ये, चराचरात समतेचे तत्व आण...

ज्याप्रमाणे संत ज्ञानेश्वार आपल्या पसायदानातून अखिल मानवजातीसाठी सुख मागतात त्याचप्रमाणे `प्रेम उठाव` या संग्रहातून कवी रणखांबे अक्षय प्रेमाचे मागणे मागत आहेत. हे मागणे मागताना ते म्हणतात...

सुगंधाने आयुष्याला
दरवळू दे....
विश्वासाने प्रेमाला
वाढू दे...

कवीचे हे मागणे त्याच्यापुरते मर्यादित नसून प्रेम ही संकल्पना मांडताना त्याने संपूर्ण जगाचा विचार केला आहे. प्रेम या शब्दाची व्याप्तीच इतकी मोठी आहे की तिला शब्दांच्या मर्यादाही कमी पडतात. या संग्रहात `प्रत्येकाच्या आयुष्यात प्रेम होत असतं` या पहिल्या कवितेपासून `जगण्याचा झोका` या शेवटच्या कवितेपर्यंत येता येता प्रेम अधिकच व्यापक होत जाते आणि हेच कवी नवनाथ रणखांबे यांच्या लेखणीचे सामर्थ्य आहे. हाच खरा प्रेमाचा विजय आहे.

अशाप्रकारे हा संग्रह वाचणाऱ्या प्रत्येकाच्या मनात या खऱ्या अक्षय प्रेमाची रुजवात होवो आणि मनामनातील वैरभाव संपून या विश्वात प्रेमभाव दृढ होवो हीच सदिच्छा व्यक्त करुन मी कवी नवनाथ रणखांबे यांना मनापासून शुभेच्छा देते.

कवितासंग्रह : प्रेम उठाव
कवी : नवनाथ आनंदा रणखांबे
मूल्य : 90/- रुपये

# शेवटचा दिस



ज्ञानेश्वर गायके
मो.नं. 9403384889

आधुनिक केसरी


सुधीर एम. ए. एम. फील.पूर्ण करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाचे दर्शन घेऊन विद्यापीठाच्या बाहेर पडला. औरंगाबाद बस स्थानकातून एस. टी. पकडून घराकडे निघाला. तो आता कितीतरी महिन्यांनी घरी चालला होता. त्याच्या मनात विविध प्रकारचे विचार येत होते. प्राध्यापक झाल्याचं गोड स्वप्नं पाहता पाहता त्याच्या गावाच्या जवळ असलेल्या फाट्यावर गाडी थांबली अन तो उतरून पाच कि. मी.  कच्च्या रस्त्याने पायी चालत घरी पोहचला.

घरी अनेक पिढ्याचं दारिद्र्य अन अज्ञान असल्यामुळे अन तो त्याच्या घराण्यातील पहिला मुलगा होता की त्याने शिक्षण हे वाघिनेचे दूध प्राशन केले होते.

त्या काळात विनाअनुदानित वरिष्ठ महाविद्यालयात प्राध्यापक पदाच्या रिक्त जागा भरण्याची प्रक्रिया सुरू होती. सुधीरने अनेक कॉलेजच्या पायऱ्या चढून आपल्या चपला झिजवल्या व शेवटी एका अनुदानास पात्र असणाऱ्या  कॉलेजमध्ये  प्राध्यापक म्हणून रुजू झाला.

आता सुधीर इमानेइतबारे कॉलेजमध्ये मुलांना शिकवू लागला. सध्या कॉलेजला अनुदान नसल्याने प्राचार्य पद नावापुरते भरले होते म्हणून सुधीरला नावापुरती उपप्राचार्य पदवी देऊन संस्थाचालक कॉलेजच्या प्राचार्याचे कामे ही त्याच्या कडून करून घेऊ लागले.

पाच वर्षे विना मोबदला सेवा केल्यानंतर कॉलेजला पंचवीस टक्के अनुदान मिळाले.तेव्हा संस्थाचालकाने  सुधीरला बोलावून घेतले व म्हणाले,”सर,तुम्हाला माहीतच आहे की आपल्या कॉलेजला स्वतःची इमारत नाही. असं किती दिवस भाड्याच्या इमारतीमध्ये कॉलेज चालवायचे म्हणून मी निर्णय घेतला की प्रत्येक प्राध्यापकाकडून आठ-आठ लाख रुपये डोनेशन घ्यायचे. तुम्ही बरेच दिवस विनामोबदला सेवा केली असून तुमच्या मेहनतीमुळे कॉलेजला अनुदान मिळणार आहे म्हणून तुम्ही फक्त पाच लाख रुपये दया म्हणजे झालं!”  आता सुधीरचे तर डोळेच फाटले.अख्ख भरलेलं आभाळ ढगफुटी होऊन  अंगावर कोसळावं अन निस्तारण्याआधी सारं अस्ताव्यस्त  होऊन महापूरात वाहून जावं असं झालं. आता सावधगिरीने सुधीर म्हणाला. “साहेब, मी मुलाखत दिली तेव्हा आपण म्हणाला होता की तुझ्या कडून एक रुपया ही घेणार नाही.कॅटेगिरीचा माणूस भेटला हेच माझं भाग्य आहे. अन आज पाच वर्षे सेवा झाली व आता अनुदान मिळणार तर तुम्ही पैसे मागू लागले अन इतके पैसे मी देऊ कुठून?घरी फक्त एक झोपडी होती ती ही जळीत झाल्यामुळे जळून गेली आज आईबाप व बायको मुलांना घेऊन मी गावातील चावडीत संसार थाटला हे तुम्हाला माहीतच आहे.”




पण सुधीरच्या या आर्त विनवणीकडे त्या जाड कातडीच्या संस्थाचालकाने साफ दुर्लक्ष करून नवीन प्राध्यापक पदाची जाहिरात काढून त्याच्या जागेवर चांगले आठ लाख रुपये घेऊन दुसऱ्या तरुणाला प्राध्यापक करून मोकळा झाला. सुधीरच्या स्वप्नांची एका क्षणात राखरांगोळी झाली. समोर घनदाट काळोख पसरला. सूर्य पुन्हा उगण्याची आशा मावळली.

माझ्या उभ्या आयुष्याचं वाटूळं झालं. माझ्या बापानं मास्तर पाहून माझं तुमच्याशी लग्न लावून दिलं. चांगला एक लाख रुपये हुंडा देऊन!”  रडता रडता त्याची बायको म्हणाली. त्याला नोकरीवरून काढलं हे साऱ्या जगाला माहीत झालं अन गावातील टोळबहिरे मुद्दाम त्याला मास्तर म्हणून हिणवू लागले.त्याने आता नातेवाईकांना भेटणे ही बंद केले. तो आता नैराश्याच्या गर्तेत सापडून दारूच्या आहारी गेला.कधी कधी आत्महत्या करण्याचा भयानक विचार त्याच्या मनात येऊ लागला पण लग्न होऊन एका मुलीचा बाप होण्याचं भाग्य त्याला लाभलं होतं म्हणून त्या सोनूल्या पाखराला त्याच्या हक्काचं आकाश देण्यासाठी जगणं क्रमप्राप्त होतं म्हणून काही झालं तरी लढायचं अन जिंकायचं या विचाराने भारावला. त्याच्या एका मित्राने सल्ला दिला की आता तू मुंबईत जाऊन आपल्या पालकमंत्र्यांकडे तुझं गाऱ्हाणं मांड. पालकमंत्री खूप चांगले आहे.तुला नक्की न्याय मिळेल कारण तुझे ते संस्थाचालक त्यांच्या पक्षाचे पदाधिकारी आहेत.

आता रेल्वेने विनातिकीत प्रवास करून तो जगाच्या मायानगरीत पोहचला.दादरला उतरून मंत्रालयात गेला व पालकमंत्री महोदयांना भेटून त्याचे गाऱ्हाणे मांडले.मंत्रीमहोदय यांनी तात्काळ त्याच्या संस्था अध्यक्षाला फोन करून मुबंई पर्यत माणसं येणं हे तुमच्या अकार्यक्षमतेचं लक्षण असून लवकर या मुलाला लवकर नोकरी लावून दया असे सुनावले.

त्यानंतर सुधीरला संस्था अध्यक्षाने बोलावून सांगितले की कॉलेज मधील तुझे पद भरले असून दुसरा पर्याय म्हणून तू आता बी. एड. कर म्हणजे मी तुला एखाद्या कनिष्ठ महाविद्यालय किंवा माध्यमिक शाळेत नोकरीस लावून देतो. हया आश्वासनानुसार सुधीरने आता बी. एड.ला प्रवेश घेऊन ते चांगल्या गुणाने पास केले व संस्थाचालकाकडे गेला. त्यांनी त्याला दोन तीन वर्षे चकरा मारून दिल्यानंतर एका माध्यमिक विद्यालयात विनाअनुदानित तुकडीवर तात्पुरत्या स्वरूपात बिनपगारी नोकरी दिली व चक्क दहा वर्षे विना मोबदला राबवून घेतल्यानंतर अनुदानित जागेवर नियुक्ती दिली.

अन दोन तपे होरपळून सुधीर वयाच्या पन्नाशीत अर्ध आयुष्य बरबाद झाल्यानंतर फुलपगारी शिक्षक झाला.अन पुढे रिटायर्ड होण्यास किमान आठ वर्षे बाकी असून तितक्या दिवस तरी पूर्ण पगार मिळेल या आनंदांत पावशेर पेढे घेऊन घरी आला. कुटुंबातील सर्वांचं तोंड गोड करून बळेबळे म्हणू लागला की अखेर शेवटचा दिस गोड झाला.

# Love You जिंदगीची शिल्पकार : नंदिनी भावसार



संजय व्यापारी
संपर्क क्र. 7743918559

आधुनिक केसरी

**तू आदिशक्ती तूच महाशक्ती तुच वरदायिनी कालिका, तुझ्या कृपेने सजला नटला संसार हा जगाचा. देवाने नारीला एक विशेष शक्ती प्रदान केलेली आहे, याची प्रचिती आपणास शेकडो वर्षांपासून आलेली आहे व येत आहे याची अनेक उदाहरणे आपण पहात आहोत, हल्लीच्या युगात तर नारीशक्ती खूपच अग्रेसर आहे सर्व ठिकाणी मग ते शिक्षण क्षेत्र असो किंवा व्यवसाय, तंत्रज्ञान असो किंवा विज्ञान म्हणून अशा काही नारीशक्तींची ओळख आम्ही आपणास आमच्या या लेखमालेतून करून देत आहोत.**

नंदिनी भावसार यांचे शिक्षण मालेगाव येथे झाले. घरची परिस्थिती हलाखीची असल्यामुळे काही तरी जॉब करता येईल का म्हणून 1996 ला त्यांनी कॉम्प्युटरचा कोर्ससाठी प्रवेश घेतला, आणि तेथेच कॉम्प्यूटर शिकवण्याचे काम सुरू केले. आणि अशा पद्धतीने पार्ट time जॉब करत स्वतःचे इलेक्ट्रॉनिक्स आणि टेली कम्युनिकेशन मध्ये शिक्षण पूर्ण केले पण कॉम्प्यूटर मध्येच आवड असल्यामुळे त्यांनी लग्नानंतर म्हणजे 2002 ला इन्फोसिस कॉम्प्यूटर नावाने इन्स्टिट्यूट स्थापन केले.

स्वप्न तर प्रत्येक जण बघतो पण ते पूर्ण करण्याची जिद्द काहीच लोकांमध्ये असते आणि याच जिद्दीने पेटून 2007 मध्ये त्यांनी इतर सेंटर्स ला मागे टाकत एन 6 मध्ये MKCL ची मान्यता मिळवली पहिल्याच वर्षी बेस्ट परफॉर्मन्स अवॉर्ड मिळवत आपल्या कर्तृत्वाची छाप त्यांनी MKCL मध्ये दाखवली. यानंतर यशाच्या दिशेने प्रवास सुरु झाला आणि बेस्ट आयटी टीचर अवॉर्ड, मुलांना जॉब मिळवून दिला म्हणून learning to earning अवॉर्ड, दिव्य चेतक अवॉर्ड असे अनेक अवॉर्ड त्यांच्या नावे होत असतानाच त्यांना एक मोठा धक्का बसला.

पण म्हणतात ना आयुष्यात महान बनण्यासाठी




कधी कधी मोठे धक्के खावे लागतात. आणि असाच मोठा धक्का त्यांना लागला तो त्यांच्या आवडत्या विद्यार्थ्याने अभ्यासाच्या ओझ्याने प्राण गमावले आणि याच धक्क्याने त्यांनी यावर अधिक संशोधन केले आणि अभ्यासाच्या ओझ्याने आत्महत्या करणाऱ्या विद्यार्थ्यांची आकडेवारी पाहून त्यांना शॉक लागला.. त्यांच्या लक्षात आले की अनेक विद्यार्थी अभ्यासाला ओझे समजतात. मग त्यांनी यावर एंजॉय युवर स्टडी नावाची कार्यशाळा घेणे सुरू केले. यामध्ये विद्यार्थ्यांना त्यांच्यात असलेल्या पॉवरफुल ब्रेनची त्या ओळख तर करून देतच होत्या पण त्यांच्या कार्यशाळेत सहभागी झालेला प्रत्येक विद्यार्थी पुस्तकाचे pages स्कॅन करून आपल्या पालकांना आश्चर्यचकित करतो. अशा पद्धतीने त्यांनी आपल्या कार्यशाळा संपूर्ण महाराष्ट्रात घेत हजारो विद्यार्थ्यांना अभ्यासाच्या ताणतणावातून मुक्त केले आहे.

मग त्यांनी आपले कार्य पुढे नेत युवा वर्गासाठी काम सुरू केले. आज बेरोजगारी विषयी अनेक जण बोलतात पण त्याच्या मुळापर्यंत जाण्यात कोणी ही इंटरेस्ट घेत नाही. मात्र नंदिनी भावसार यांनी तरुणांना interview ची तयारी करण्यासाठी personality development चे ट्रेनिंग देणे सुरू केले. या मध्ये विद्यार्थ्यांमधील न्यूनगंडाला संपूर्णपणे बाहेर फेकले जाऊन स्वतःचा शोध घेतलेला तरुण जगाला मिळतो आणि त्याच्या आत्मविश्वासावर तो स्वतःचा व्यवसाय तरी टाकतो नाही तर चांगली नौकरी तरी मिळवतो .

रिटायरमेंटचे आयुष्य अगदी कंटाळवाणे जगणाऱ्या सिनियर सिटीजन साठी love you जिंदगी सारखे सेशन घेत आज त्या अनेक लोकांच्या आयुष्यात value ऍड करत आहेत आणि समुपदेशनातून अनेकांना नव्याने आयुष्य जगायला सांगत आहेत. अशी ही आदिशक्ती आदिमाया नंदिनी.. अतिशय प्रेमळ, सदा आनंदी आणि विद्यार्थी हितासाठी धडपडणा-या नंदिनीला केंद्रीय अर्थराज्य मंत्री यांच्या तर्फे हिरकणी पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. सामाजिक कार्यातही त्यांचा फार मोठा वाटा आहे जसे जवानांना राखी पाठवणे किंवा महिलांना डिजिटल बनवण्यासाठी विविध कार्यशाळा असो की अनाथ आश्रमात वाढदिवस करणे किंवा दिवाळी साजरी करणे असो अशा अनेक कार्यक्रमातून त्या आपल्या आदर्श जीवनाचा वसा नवीन पिढीला देत आहेत.

## नंदिनी भावसार यांचे कर्तृत्व



नंदिनी भावसार
संपर्क क्र. 8275365940

1. त्या इन्फोसिस कंपूटर आणि मयुरी कंपूटर टायपींग इन्स्टिट्यूट च्या डायरेक्टर आहेत
2. DNSCAPS Llp या सॉफ्टवेअर कंपनी च्या CEO आहेत
3. त्याचे नाव OMG national book of Records मध्ये नोंदवण्यात आले आहे
4. त्यांना ट्रेनर्स असोसिएशन ऑफ इंडिया तर्फे इंटरनॅशनल स्पीकर जयंत हुद्दार यांच्या असते PERFECTIONIST या टायटल ने गौरविण्यात आले आहे
5. केंद्रीय अर्थराज्य मंत्री यांच्या हस्ते त्यांना हिरकणी म्हणून गौरविण्यात आले आहे
6. त्या बेस्ट सेलर बुक बी द मास्टर या पुस्तिकेच्या लेखिका आहेत. जे सर्व ऑनलाइन platform वर उपलब्ध आहे. 7. Lockdown मध्ये त्यांच्या ब्रेन development सेशन ला दुबई, कोलकत्ता , म्यानमार येथून चांगला प्रतिसाद मिळाला होता. आणि तेथील विद्यार्थ्यांनी ही संधीचा लाभ करून घेतला.
8. आज त्या संपूर्ण भारतभर parenting Coach, stress management, career guidance, Corporate Etiquette, Mental Health awareness या संदर्भात कार्यशाळा घेत आहेत






# म्हैसमाळची गिरीजादेवी

आधुनिक केसरी

औरंगाबाद जवळील खुलताबाद हे गाव देवगिरीच्या अभेद्य किल्ल्यासाठी सर्वांनाच परिचित आहे. खुलताबाद जवळील म्हैसमाळ छोटस गाव हे उंच ठिकाणी असलेलं गाव थंड हवेच्या शीतल वातावरणामुळे हे गाव प्रसिद्ध आहे. अशा या हिरवागार वनश्रींना बहरलेल्या डोंगराच्या पायथ्याशीच गिरिजा देवीचे हे प्राचीन मंदिर आहे. खूप पूर्वी या परिसराला " महेशमाळ " असे संबोधले जात होते .दरवर्षी माग पौर्णिमेला या मंदिराच्या परिसरात खूप मोठी यात्रा भरते. ही यात्रा दोन दिवस चालते. या कालावधीत मंदिरावर छान रोषणाई केली जाते. या यात्रेची सुरुवात एकादशीला होते याच काळात मंदिराच्या समोरील बाजूस मानाची काठी बसवली जाते . पौर्णिमेच्या रात्री काठीची पूजा करून मिरवणूक काढण्यात येते. गिराज गिरिजा देवीच्या मंदिरात काठी म्हणून तिचे पूजन केले जाते.

नवरात्राच्या वेळी मंदिरात खूप मोठ्या प्रमाणावर उत्सव साजरा करण्यात येतो . तहसीलदारांच्या हस्ते पूजा आरती करण्याचे येथे परंपरा आहे .या देवीच्या दर्शनासाठी विशेष करून बंजारा.. लमाणी समाजातील लोक मोठ्या प्रमाणावर अत्यंत भाविकतेनं येतात .आपल्या मनातील इच्छापूर्ती होण्यासाठी ते भाविक देवीला साकडे घालतात. त्यांची मनातील इच्छा पूर्ण झाल्यानंतर पुन्हा त्या ठिकाणी येतात आणि देवीची कथा सांग पूजा करून नैवेद्य आरती करून आपल्या मनातील इच्छा पुर्ण झाली म्हणून ऋण व्यक्त करतात.

नवरात्र महोत्सवाच्या वेळी नऊ दिवस नियमितपणे औरंगाबादहून हजारोंच्या संख्येने भाविक लोक गिरीजा देवीच्या दर्शनासाठी येत असतात. पूर्वी यात्रेच्या वेळी फक्त एसटीची व्यवस्था केली जात होती. आता मात्र नवरात्र उत्सवात देखील दररोज नियमितपणे एसटी व्यवस्था या गिरिजा देवीच्या मंदिरापर्यंत केलेली आहे. म्हैसमाळच्या या गिरीजादेवीस प्रसाद म्हणून रेवडीचा नैवेद्य दाखवण्याची प्रथा प्रचलित आहे. त्यामुळे यात्रेच्या वेळी तसेच नवरात्राच्या नऊ दिवस ही रेवड्यांची खूप मोठ्या प्रमाणावर या ठिकाणी विक्रीची उलाढाल होते .त्याचबरोबर हजारो भक्तांचे आरोग्याची काळजी घेण्यासाठी फिरत्या दवाखान्याची देखील या ठिकाणी सोय केलेली असते.




सुधीर कोटीकर,
संपर्क क्र. 9765553312

यात्रेच्या निमित्याने विविध वस्तूंची सौंदर्यप्रसाधनाची खेळण्याची दुकाने या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर लावलेली आपणास दिसतात .म्हैसमाळ हा गिरीजा देवीच्या पदस्पर्शाने पावन झालेला हा परिसर आहे. निसर्गाचा वरदहस्त लाभलेला अत्यंत रमणीय हे ठिकाण खूप मोठ्या प्रमाणावर या ठिकाणी पर्यटक सातत्याने येत असतात.

गिरीजा देवीच्या बरोबर डोंगरांच्या अगदी टोकावर बालाजीचे मंदिरही खूप सुंदरपणे उभं करण्यात आलेला आहे. अप्रतिम कला कौशल्याचा सुंदर नमुना म्हणजे हे बालाजीचे मंदिर म्हणावं लागेल . देवीच्या दर्शनानंतर ते सारे भक्तगण बालाजीच्या दर्शनासाठी जातात. त्या ठिकाणी म्हैसमाळच्या जवळच दूरदर्शनने डोंगरावर एक खूप मोठा मनोरा उभा केलेला आहे . दूरदर्शनचे दैनंदिन प्रसारण याच केंद्रावरून केले जाते. निसर्गाच्या या प्रसन्न वातावरण आल्यावर नेत्रसुखाची करावी तितकी लयलूट अपुरीच आहे असे वाटल्यास नवल ते काय... म्हणूनच गिरीजा देवीच्या दर्शनासाठी औरंगाबाद वरून हजारो भक्तगण सातत्याने येत असतात हे बाकी खरं....



# नवशक्तीचे नऊ रंग

## चौथा दिवस : रंग पिवळा



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

बदल हा काळाचा नियम आहे! सातत्याने सृष्टीत आणि इतरत्रही बदल होत असतात. आदिम काळात असेल का हा नवरात्रोत्सव? असेल तर कसा असेल? मुलतः या नवदुर्गादेवी कोण आहेत? यांचीच का पूजा केली जात असेल? असे एक ना अनंत प्रश्न सहजच समोर येऊन जातात! माणसाने अगोदर अन्न, वस्त्र, निवारा याची सोय केली. शेतीचा शोध स्त्रीनं लावला! कालौघात अनंत घडामोडी घडत गेल्या.

जगात मातृसत्ताक कुटुंब पद्धती होती. विवाह, संसार, पती-पत्नी हा एकदम अलीकडचा विषय! मातृसत्ताक कुटुंब पद्धतीत पुरुषाचं स्थान अपत्य जन्माला घालण्या पुरतंच! बहीणच भावाचा खरा आसरा. भावाने बहिणीची मुलं सांभाळायची, संगोपन करायचं. मग मुलं आईला मा, तर आईसारखीच काळजी घेतो म्हणून त्याला मामा म्हणायचे! त्यानंतर स्त्रीने इथल्या अनेक हिंस्र, घातक, दुष्ट, दुर्जन शक्तींचा विनाश केला. श्री देवी म्हणजे कुणी स्वर्गातून अवतरलेली कालिका, चंडिका, महिषासुरमर्दिनी नसून आपल्यातीलच शूर-वीर स्त्रियांनी इथल्या समाजविघातक शक्तींशी मोठ्या निकराने लढा देऊन, त्यांना नामोहरम केले! आज श्री देवीची विविध नावं, रूपं किंवा फोटो पाहतो, ती अत्यंत बोलकी, क्रांतिकारी आणि प्रतीकात्मक आहेत! तिला दोनपेक्षा जास्त हात आहेत. ती सिंहावर आरूढ होऊन आली आहे! मुद्रा क्रोधायमान असून डोळे लालबुंद आहेत! विशेषतः या देवीनं भयंकर दैत्याला पराभूत करून पायाखाली घेतलं आहे! श्री अष्टभुजा देवी युद्धासाठी सदैव तत्पर आहे! तिच्या हातात युद्धपूरक त्रिशूळ, चक्र, तलवार, गदा, धनुष्य-बाण, कमळ, शंख ही आयुधं आहेत आणि एका हाताने ती आशीर्वाद देत आहे!

विविध धार्मिक ग्रंथांमध्ये एक ईश्वराचं विराट विश्वरूप दर्शन आणि दुसरं दशानन रावण, ही दोन रूपं सोडली तर एवढं भयंकर, भीतीदायक, प्रलयकारी, अक्राळ-विक्राळ रूप एकाही देवाचं किंवा राक्षसाचं सुद्धा कुठंच सापडत नाही! हे फारच मजेशीर आहे! यावर सखोल संशोधन होणं अपेक्षित आहे.

अष्टभुजा असणारी श्री देवी म्हणजेच जगाचा अंकुर गर्भात संस्थापित करून संगोपन करणारी आपली आई! बहिण-पत्नी-कन्या-मैत्रीण या रूपांनी पुरुषाचं जगणं-मरणं सुकर करणारी हीच ती जगतजननी! 'आजघडीला ती पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून लढते आहे', असे बोलणे म्हणजे अगोदर ती कमजोर होती का? हे विधान धादांत खोटे-चूक असून पुरुषी अहंकार दर्शवणारे आहे! ती अगोदरही शक्तीशाली होती, आजही आहे आणि सृष्टीच्या शेवटच्या क्षणापर्यंत ती शक्तीशालीच राहणार आहे, यात तिळमात्र शंका नाही!

आज चतुर्थदिनी श्री देवीकूष्मांडानावाने प्रकट झाली आहे. कुष्मांडा म्हणजेच सुख-दुःखात सुद्धा चेहऱ्यावर स्मित ठेवून संपूर्ण ब्रह्मांड आनंदी करणारी स्त्री शक्ती!

कुष्मांडाः ऐं ह्री देव्यै नमः वन्दे वांछित कामार्थे चन्द्रार्धकृतशेखराम्।
सिंहरूढ़ा अष्टभुजा कूष्माण्डा यशस्विनीम्॥

या मंत्रासह अनाहत चक्रावर मन एकाग्र करून साधना केल्यास मनुष्याला अंतर्बाह्य शुद्धी प्राप्त होते. आज ती पिवळे वस्त्र लेवून आली आहे. पिवळा रंग म्हणजे प्रकाश, ज्ञान, संपन्नता, अध्यात्मिक आवड, नेतृत्वगुण, स्वयंशिस्त, स्वाभिमान आणि जबाबदारी इत्यादी गुणांचा द्योतक आहे! अनंतकाळापासून मातृशक्ती हे दैदिप्यमान गुण अंगी बाळगत संपूर्ण विश्वाचं भरणपोषण करते आहे! चला, या निमित्ताने स्त्री शक्तीला समजून घेऊन तिला दुय्यम न समजता, ती एक श्रेष्ठ-शक्ती आहे हे लक्षात ठेवूयात! त्याचबरोबर स्त्री शक्तीने सुद्धा स्वतःला अबला न समजता, आपण सबला आहोत असा निर्धार करून बदलत्या काळाबरोबर निकराने लढावे! आपल्या पूर्वज देवींचा वसा-वारसा चालवावा! कुष्माण्डा माता की जय!

**(टीपः लेखक हे व्याख्याता, कवी, लेखक, प्रबोधनकार, प्राणायाम प्रशिक्षक आहेत)**

# कमळजा मातेचा नवरात्रोत्सव उत्साहात

आधुनिक केसरी

**लोणार : जगप्रसिद्ध लोणार सरोवरात नवरात्रोत्सवात कमळजा मातेचे दर्शन घेण्यासाठी मांदीपाळी सुरू झाली आहे. दर्शनसाठी विदर्भासह मराठवाड्यातील भाविकांचीही गर्दी होत असते. लोणार सरोवरातील दाट वनराईत कमळजा मातेचे हेमांडपंथी मंदिर आहे. कमळजा माता ही भक्तांच्या नवसाला पावणारी म्हणून प्रसिद्ध आहे.**







कमळजा देवी मंदिरासमोर सासू-सुनेची विहीर आहे. या विहिरीचे अर्ध्या बाजूकडील पाणी खारट आहेत.कोरोनाच्या संकटकाळात सदर मंदिर भाविकांसाठी बंद करण्यात आले होते मात्र नवरात्रोत्सवानिमित्त भाविकांसाठी कमळजा देवीचे मंदिर खुले करण्यात आले आहे.परंतु वन्यजिव विभागाच्या वतीने भाविकांसाठी विशेष नियमावली जारी केली असून दर्शनासाठी सरोवरात प्रवेश करणाऱ्या भाविकांनी नियमांचे पालन करावे, असे आवाहन वन्यजीव अभयारण्य लोणारच्या वतीने करण्यात आले आहे. लोणार सरोवरातील कमळजा माता देवीचे मंदिर हे जवळपास १ हजार वर्षे जुने आहे. विदर्भ-मराठवाड्यातील हजारो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या कमळजा मातेच्या दर्शन कोरोनानंतर पहिल्यांदाच घेता येणार असल्याने भाविकांमध्येआनंदी वातावरण आहे. सदर मंदिर सरोवरातील अभयारण्य क्षेत्रात असल्याने या जंगलातून पायी चालतच जावे लगाते. या क्षेत्रात जंगली प्राण्यांचा मुक्त संचार असतो त्यामुध्ये प्रामुख्याने बिबट् ,कोल्हे, तडस यासारखे हिस्त्र प्राणी तसेच विषारीसाप सुध्दा असल्याने भाविकांनी सकाळी ६ वाजेनंतरच सुर्यप्रकाश असताना दर्शनासाठी गटागटाने जावे, तसेच वनविभागाने नेमून दिलेल्या पायवाट रस्त्याचाच वापर करावा, सोबत कुठल्याही प्रकाच्या प्लास्टिक कॅरिबॅग नेऊ नये, नोंदणी करूनच सरोवरात प्रवेश करावा, लहान मुले स्त्रीया, वृद्ध व्यक्तींनी आपल्या सुरक्षेची योग्य ती काळजी घेणाऱ्या व्यक्ती सोबतच दर्शनासाठी जावे, जाताना येताना आरडा-ओरड करु नये, वन्यप्राण्यांना किंवा पक्षांना त्रास होईल असे वर्तन करु नये, आवाहन वनविभाग आणि वन्यजिव विभागाच्या वतीने करण्यात आले आहे. वन्यजिव विभागाच्या वतीने ठरवून दिलेल्या नियमांचे पालन करुनच भाविकांनी कमळजा माता दर्शनासाठी यावे, असे आवाहन वन्यजीव विभागाचे वनपरिक्षेत्र अधिकारी चेतन राठोड यांनी केले आहे.

**यासीन शेख**



# यमाई देवी

आधुनिक केसरी

**सातारा जिल्ह्यामधील खटाव तालुक्यातील औंध हे संस्थान म्हणजे यमाई देवीचे संस्थान म्हणून ओळखले जाते.पंतप्रतिनिधी यांच्या काळात हे संस्थान नावारूपास आले येथील इतिहास काळाच्या पटलावर कोरला गेला. महाराष्ट्रातील या आदिमायेचे महत्त्वाचे स्थान म्हणजे माहूर. याच माहूरच्या रेणुकेचे हे एक स्थान.**





रेणुका मातेचे अनेक स्थाने आहेत कर्नाटक मधील सौंदती या ठिकाणी जगदंबा 'यल्लमा' म्हणून ओळखली जाते यल्लमा ची उत्पत्ती योळ (म्हणजे) आणि अम्मा म्हणजे माता सप्तमातृका वरून झाली असावी आणि त्यावरून यमाई नाव पडले असावे असे काही सांगतात यमुना चं पर्वतावर ची देवी म्हणून हे नाव अगदी योग्य असल्याचे म्हटले जाते.

असे म्हटले जाते की औंधासुराचा वध मूळमाया यमाईदेवीच्या हाताने होणार असतो तेव्हा केदारनाथ यांनी तिला 'यमाई' अशी साद घातली तेव्हा तिचे नाव 'यमाई' असे रूढ झाले श्री यमाई देवीने औंधा सुराचा वध करून केदारनाथाचा दक्षिणेकडील मार्ग निष्कलंक केला हे सर्व सातारा जिल्ह्यातील औंध या गावी घडले आकंठ गिरिया डोंगरावरुन मूळमाया यमाई देवी औंध करण्यासाठी या ठिकाणी प्रकट झाली म्हणून या कंठगिरी चे नाव मुळगिरी झाले अशी आख्यायिका आहे. देवीची यमाई देवीची संस्थानात दोन स्थाने आहेत एक औंध गावात डोंगरावर स्थित मूळ पीठ जोतिबांच्या सांगण्यावरून ज्या ठिकाणी देवी विसावली ते मूळपीठ.

औंधासुराचा वध या ठिकाणी केल्यामुळे या ठिकाणाला औंध हे नाव पडले.सुमारे ४३२ पायऱ्या चढून गेल्यावर आईचे मंदीर आहे .मध्य युगाच्या सुरवातीच्य काळात बांधलेले हे मंदीर आहे. मंदीराभोवती तटबंदी असून,१० बुरूज आहेत . मुख्य द्वार उत्तरेस आहे. मंदिराची विशेष गोष्ट म्हणजे देवी समोर नंदी आहे. चर्तुभुज अंबिकेची मुर्ती भव्य असून सुमारे सहा फूट उंचीचे आहे . काळ्या पाषाणातील या भगवती देवीने हातात त्रिशूल, गदा, बाण ,दानपत्र धारण केले आहे. देवीचे दुसरे मंदिर औंध गावात आहे मंदिर पंत प्रतिनिधींच्या वाड्याजवळ आहे संस्थांचा राजदरबार भगवती समोर भरत असते हे मंदिर भगवान पंतप्रतिनिधी यांनी बांधल्याचा उल्लेख आहे पूर्वाभिमुख मंदिराच्या प्रांगणात चार दीपमाळा असून त्यातील एक भव्य आहे मंदिराचा सभामंडप लाकडी असून सुमारे 65 हजार रुपये खर्च करून बांधण्यात आल्याचे समजते सुमारे 65 फूट उंचीच्या या दीपमाळेवर 176 दिवे लावता येतात दगडी घाबरत देवीची काळ्या पाषाणाची मूर्ती आहे.

ती चांदीच्या प्रभावळीत बसवलेले आहे पंचधातूची ही एक मूर्ती आहे. मंदिर परिसरात मोकळाई देवीचे मंदिर आहे देवीने केस मोकळे सोडून येथे असलेल्या जलाशया त . यावेळी लावणाऱ्या दिप माळी चे सौंदर्य अलौकीक वाटते.असे हे औंधचे संस्थान त्या संस्थांना मधील यमाईदेवीचे मंदिर अतिशय भव्य व नैसर्गिक सौंदर्याने नटलेले आहे.

**मिलिंदा पवार वडूज(खटाव)**
**संपर्क क्र. 97309 09359**

# कडेठाण येथील महालक्ष्मी देवी नवरात्र उत्सवास प्रारंभ

आधुनिक केसरी

पैठण तालुक्यातील कडेठाण येथील कोल्हापूर निवासिनी ही महालक्ष्मी देवीच्या मंदिरात सोमवारी घट स्थापनेने नवरात्र उत्सव प्रारंभ झाला. या महालक्ष्मी मंदिराला मोठा पुरातन इतिहास असून फार प्राचीन काळी हे तीर्थक्षेत्र कटिस्थान या नावाने ओळखले जायचे. जुन्या कटिस्थान या नावाचा अपभ्रंश होत कडेठाण हे नाव तयार झाले आहे. कडेठाण हे देवीचे गाव म्हणून ओळखले जाते. या अत्यंत साधारण असलेल्या गावाला अनन्य साधारण असे महत्त्व प्राप्त झाले केवळ येथील कोल्हापूर निवासिनी श्री महालक्ष्मी मंदिर मुळेच जगजननी श्री अंबाबाईचे मूळ पीठ श्री शेत्र कोल्हापूर असून या पिठाची एक शाखा म्हणजे ठाणे कडेठाण येथे आहे. मराठवाडा भागामध्ये कोल्हापूरच्या अंबाबाईचे एवढेच एकमेव ठाणे उपलब्ध आहे. सध्याचे मंदिर परिसर अत्यंत भव्य दिव्य असून येथे भाविकांना अनेक प्रकारचा सुविधा पुरविल्या जातात. येथे महालक्ष्मी देवीचे मोठे मंदिर असून त्याच्या बाजूलाच कटीश्वर महादेवाचे सुद्धा मंदिर आहे. दोन्ही मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे.पैठण तालुक्यातील सर्व भाविकांचे हे श्रद्धास्थान आहे. नवरात्र उत्सवानिमित्त येथे नऊ दिवस विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते.यात रोज सकाळ संध्याकाळ आरती. देवी आराधना. काकडा. भजन. किर्तन. भारुड. गोंधळ तसेच सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले जातात.सर्व भाविक भक्तांनी नवरात्रीमध्ये महालक्ष्मी देवीच्या दर्शनाचा लाभ घ्यावा असे आवाहन गावचे सरपंच संभाजी तवार वं मंदिराच्या ट्रस्ट ने केली.

**शंकर नीळ, कड़ेठाण, पैठण**



# कन्नडला अग्रसेन महाराज जयंती उत्साहात साजरी

## उद्योजक मनोज पवार यांचा सहभाग : जयंतीनिमित्त शहरात विविध सामाजिक कार्यक्रम

आधुनिक केसरी न्यूज



**कन्नड :** शहरातील अग्रवाल समाजाचे प्रवर्तक महाराजा अग्रसेन महाराज यांची जयंती कन्नड शहरात विविध सामाजिक उपक्रम राबवत मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी शहरातील अग्रवाल समाज बांधवांनी महाराजा अग्रसेन महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून त्यांच्या आदर्शांचे स्मरण केले तसेच कन्नड मधील अग्रवाल समाजाच्या बांधवांनी एकमेकांना मिठाई खाऊ घालून परस्पर ऐक्य व समता या विषयावर विशेष भर दिला. महाराजा अग्रसेन यांच्या जीवनकथेचे वर्णन करताना समाजातील ज्येष्ठ नागरिक म्हणून श्याम पीर्थानी म्हणाले की, आपल्या अग्रवाल समाजाचा इतिहास अतिशय गौरवशाली आहे. आपल्या सर्वांना अग्रवंशी म्हणण्याचा खूप अभिमान आहे.अग्रवाल समाज हा हिंसेविरोधी आणि प्रेमाचे प्रतीक आहे, महाराजा अग्रसेनजींची कथा सांगणे म्हणजे सूर्याला दिवे दाखविण्यासारखे आहे. यावेळी उपस्थित समाज बांधवांना संबोधित करताना गोविंद राजकुमार भारुका म्हणाले की, कन्नड तालुक्यातील अग्रवाल समाज हा नेहमीच व्यावसायिक कार्यात तसेच सर्व धार्मिक व सामाजिक कार्यात अग्रेसर उत्तम भूमिका बजावत आहे. आपला अग्रवाल समाज अहिंसक, सेवाभावी, क्षमाशील आणि करुणामय आहे. आपल्या अग्रवाल समाजाला जगभरात आदराने ओळखले जाते, ही फक्त महाराजा अग्रसेन महाराज यांची शिकवण व संस्कृती आहे त्याचमुळे आज अग्रवालांमध्ये नेहमीच माणुसकीची व समाजसेवा करण्याची आवड आहे.

युवा उद्योजक तथा समाजसेवक मनोज पवार बोलताना म्हणाले की, अग्रवाल समाजातील लोक क्षमा, शांती आणि प्रेमाचे प्रतिक आहे. कन्नड तालुक्यातील अग्रवाल समाज बांधव सामाजिक कार्यात नेहमी अग्रेसर राहील. अग्रवाल समाज बांधव बघीनी साठी व शहरातील सामाजिक कार्याकत्यांनसाठी शितपेयची व्यवस्था केली होती. यावेळी रोहित पिर्थानी, रुपेश भारूका, गोविंद भारुका, यश भारुका, योगेश पिर्थानी, अरुण भारुका, दीपक भारुका, सुशील भारूका, रितेश भारूका, करण भारुका, संदेश पवार , सिध्दार्थ निकाळजे यांच्यासह समस्त अग्रवाल समाज बांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# सिडनीमध्ये झालेल्या 'हाफ मॅरेथॉन' स्पर्धेत आयर्नमॅन म्हणून पार्थ मुळे सन्मानित

आधुनिक केसरी न्यूज



**औरंगाबाद :** येथील गंगामाई इंडस्ट्रीज आणि कन्स्ट्रक्शन्स लि. कार्यकारी संचालक रणजित पद्माकर मुळे यांचे चिरंजीव पार्थ मुळे यांनी ऑस्ट्रेलियामधील सिडनीमध्ये झालेल्या हाफ मॅरेथॉन स्पर्धेत 'आयर्नमॅन' हा बहुमान पटकीविला. फार कमी स्पर्धक पूर्ण करू शकतात. २ किलोमीटर समुद्रात पोहणे, ९० किलोमीटर सायकलिंग आणि २१ किलोमीटर धावणे हे तीनही क्रीडा प्रकार, साधारण १७ ते १८ अंश सेल्सियस तापमानात एकसलग पूर्ण करावे लागणारी ही जगातील कठिण स्पर्धांपैकी समजली जाते. दर आठवड्याला २०० किलोमीटर सायकलिंग, २१ किलोमीटर धावणे आणि ५ किलोमीटर पोहणे हा क्रम पार्थ यांनी मागील वर्षभर सरावाद्वारे सांभाळला.

सिडनी येथे आरोग्य आणि तंदुरुस्तीसाठी सक्रियतेचा संकल्प कृतीत उतरविण्याची प्रेरणा देण्यासाठी या हाफ मॅरेथॉनचं आयोजन करण्यात आले होते. विजयानंतर पार्थ म्हणाला व्यायाम म्हणून धावण्याचे शारीरिक आणि मानसिक दोन्ही फायदे आहेत. साथीच्या आजारापासून, फिटनेसवर लक्ष केंद्रित करून लोकांनी सक्रिय आणि निरोगी जीवनशैली स्वीकारली पाहिजे. त्याला या विजयात प्रशिक्षक आणि मुंबईचे सहपोलीस आयुक्त विश्वास नांगरे पाटील, पद्माकर मुळे, लता मुळे, रणजित मुळे, रोहिणी मुळे, समीर मुळे, स्नेहल मुळे यांचे सहकार्य आणि मार्गदर्शन लाभले.

# फर्दापूर येथील पो.हे.कॉ. राजेंद्र साळवी उपनिरीक्षकपदी निवड

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील फर्दापूर येथील पोलीस स्टेशन फर्दापूर जिल्हा औरंगाबाद ग्रामिण येथे नेमणुकीस असलेले अत्यंत मनमिळाऊ स्वभावाचे फर्दापूर येथील पो.हे.कॉ. राजेंद्र सिताराम साळवी ब.नं. ४३२ याची सहाय्यक पोलीस उपनिरीक्षकपदी पदोन्नती झाली असुन त्यांनी पोलीस खात्यात आतापर्यंत पो.मु. औरंगाबाद, सिल्लोड ग्रामिण, वैजापुर, सिल्लोड शहर, अजिंठा, फर्दापुर अशी ३१ वर्ष निष्कलंक सेवा ग्रामीण भागात बजावली असुन त्याच्या आजपावेतोच्या कामगिरीवरुन त्यांची सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक पदी पदोन्नती देण्यात आलेली आहे. यावेळी सपोनि देवीदास वाघमोडे यांच्या हस्ते त्यांना शाल श्रीपळ देऊन सत्कार करण्यात आला आणि त्यानां शुभेच्छा दिल्या .त्यांच्या पदोन्नतीबाबत औरंगाबाद येथील ग्रामिणचे पोलीस अधिक्षक मनिष कलवाणीया, अप्पर पोलीस अधिक्षक डॉ. पवन बनसोड साहेब, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. विजयकुमार मराठे साहेब तसेच पोस्टे फर्दापुरचे सपोनि डी. बी. वाघमोडे साहेब यांनी अभिनंदन करुन त्याच्या पुढील सेवाकार्यास हार्दीक शुभेच्छा दिल्या आहे. याप्रसंगी सपोनि देवीदास वाघमोडे, उपनिरीक्षक रणजित कासले, पोलीस ठाण्याचे सर्व पोलीस कर्मचारी, पत्रकार बंधू, सरपंच, उपसरपंच, पदाधिकारी, मान्यवर यांनी शुभेच्छाचा वर्षाव केला.



# भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष यांचा भोकरदन परिसरात दौरा

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** भोकरदन तालुक्यातील परिसरात आज मराठवाडा दौऱ्यानिमित्त भोकरदन तालुक्यातील अनवा जळगाव सपकाळ  पिंपळगाव रेणुकाई या गावांचा नियोजित दौरा केला यात अनेक पदाधिकारी गावातील आजी माजी सरपंच यांच्याशी संघटनेच्या कामाविषयी संघटने विषयी सविस्तर  मार्गदर्शन करून माहिती दिली त्यावेळेस तीनही गावातील लोकांनी माझी प्रदेश अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल माझा श्री अरुण चव्हाण देशमुख प्रदेशाध्यक्ष अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समिती महाराष्ट्र राज्य यांचा शाल श्रीफळ पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला यावेळेस उपस्थित श्री राजेंद्रजी देशमुख तालुका अध्यक्ष भोकरदन भारतीय जनता पार्टी यांच्या निवासस्थानी भव्य सत्कार सोहळा ठेवण्यात आला होता श्री बाळासाहेब देशमुख तालुकाध्यक्ष भोकरदन अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समिती पंजाबराव सपकाळ माणिकराव साळवे संघटनेचे पदाधिकारी व शिवाजी पाटील आहेर माजी उपसरपंच  पिंपळगाव रेणुका ओंकारेश्वर उर्फ बंकू सेट सपकाळ माजी उपसरपंच जळगाव सपकाळ पंडितरावजी नरवडे गणेश राव सपकाळ राजेंद्र बोराडे शिवाजीराव सपकाळ विकासराव सपकाळ राजेंद्र अवचित राव सपकाळ गोकुळ गणपतराव सपकाळ प्रदेश अध्यक्ष छत्रपती सेना महाराष्ट्र तसेच गावातील स्थानिक नागरिक युवक बहुसंख्येने उपस्थित होते तसेच सर्वांना संघटने विषयी आकर्षण वाटले त्यात बऱ्याच लोकांच्या मुलाखती घेण्यात आल्या व त्यावेळी अजिंठा गावातील माझे सर्व सहकारी बंधू ही सोबत उपस्थित होते.





# पर्यटक दिनानिमित्त पर्यटकांचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** शहरात  पर्यटकांची मोठी गर्दी असते कारण पैठण शहर हे एतिहासिक व धार्मिक दृष्टी ने महत्त्वाचे असल्याने पैठण ला विविध राज्यातील पर्यटक नेहमीच भेटी देत आसतात. दि.२६ रोजी जागतिक पर्यटक दिनी पैठणला आलेल्या पर्यटकाचा पैठण शहर व्यापारी महासंघ व उद्यान बचाव समितीच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी व्यापारी महासंघाचे शहराध्यक्ष पवन लोहीया, अभियंता अशोक चव्हाण, बलराम लोळगे, पत्रकार रमेश लिंबोरे, बाळासाहेब आहेर,संतोष गोबरे, उमेश तट्टू, बाळासाहेब पठाडे, जगदीश लोहीया, आनंद बनकर, नरेश मानधने,नाना लखमले यांची उपस्थिती होती.

# कॅबिनेटमंत्री संदिपान भुमरे यांच्या हस्ते करतार डेलक्स हार्वेस्टर ग्राहकास सुपूर्द

आधुनिक केसरी न्यूज

**कचनेर :**  औरंगाबाद तालुक्यातील चितेगाव येथे भाग्यलक्ष्मी अग्रो सर्विसेस आहे. तिथे महाराष्ट्र राज्याचे कॅबिनेट मंत्री संदिपान भुमरे यांच्या हस्ते कृष्णा लांबे अहमदनगर संदीप बर्डे पाथर्डी या दोन ग्राहकांना करतार डीलक्स हार्वेस्टर च्या चाव्या देऊन हार्वेस्टर ग्राहकांना सुपूर्द करण्यात आले व भावी वाटचालीसाठी त्यांनी ग्राहकांना शुभेच्छा दिल्या. यावेळी सन्माननीय कॅबिनेट मंत्री यांनी भाग्यलक्ष्मी अग्रो सर्विसेस चे मालक साईनाथ हुलसार वं नारायण डिगोळे यांचे तोंड भरून कौतुक केले तेथील जनसमूहाला संबोधित करताना त्यांनी सांगितले की भाग्यलक्ष्मी सर्विसेस चा आदर्श घेऊन वेगवेगळे व्यवसाय सुरू करून रोजगाराची निर्मिती करावी. यावेळी भारतीय जनता पार्टीचे किसान मोर्चा जिल्हाध्यक्ष कल्याण नाना गायकवाड यांच्या हस्ते संदिपान भुमरे यांचा सत्कार करण्यात आला. सदरील कार्यक्रमाला विलास भुमरे. रमेश पवार. यांची सुद्धा उपस्थिती होती. यावेळी साईनाथ हुलसार यांनी सांगितले की हार्वेस्टर ची बुकिंग चालू असून ग्राहकांनी याचा लाभ घ्यावा.



# अजिंठ्यात शिवप्रतिष्ठानतर्फे जागर भक्तीचा उपक्रम

आधुनिक केसरी न्यूज




**अजिंठा :** येथील शिवप्रतिष्ठान ग्रुपतर्फे नवरात्री निमित्त जागर भक्तीचा हा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमाअंतर्गत सिल्लोड तालुक्यातील देवींच्या विविध शक्तीपीठांना व जागृत देवस्थानाला भेटी देऊन धार्मिक पर्यटनासह, परिसर निरीक्षणाचा कार्यक्रम राबविण्यात आला. यात पहिल्या दिवशी आणवा येथील ग्राम दैवत जागृत शक्तीपीठ आजूबाई संस्थान ला भेट देण्यात येऊन तेथील मंदिराचा इतिहास, इ.स.वी. सन 1050 वर्षी बांधण्यात आलेल्या प्राचीन शिव मंदिराचा इतिहास जाणून घेण्यात आला. या नंतर जळगाव सपकाळ येथील मातोश्री भागूबाई संस्थान, छत्रपती शिवाजी महाराज सार्वजनिक स्मारक समिती या स्थळांना भेट देण्यात आली. या ठिकाणी मातोश्री भागूबाई संस्थान तर्फे शिवप्रतिष्ठान च्या कार्यकर्त्यांचा सत्कार करण्यात आला. पिंपळगाव रेणुकाई येथील जागृत देवस्थान रेणुका माता मंदिरास भेट देऊन तेथील इतिहास जाणून घेण्यात आला. हा उपक्रम नवरात्री उत्सवा दरम्यान 4 दिवस असून युवकांनी दुचाकी द्वारे सहभाग नोंदवत आहे. यात सतीश चव्हाण, दिपक चव्हाण, शुभम पोपळघट, योगेश सनांसे, दिपक अस्तुरे, शुभम पुरे, लखन अस्तुरे, यशवंत राठोड, अरुण चव्हाण, विजय पगारे, मारोती गव्हाणे आदींनी या उपक्रमात अतिशय उत्साहात सहभाग नोंदविला.

# मराठवाड्याचा अनुशेष दूर करण्यासाठी औरंगाबादेत बैठक घ्या

## आमदार मेघना साकोरे बोर्डीकर : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन



आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** मराठवाड्याच अनुशेष दूर करण्यासाठी आणि विकासासाठी औरंगाबाद येथे दोन दिवसीय मंत्री मंडळाची बैठक घेवून मराठवाड्यातील प्रलंबित प्रश्न व विकास कामे याचे निर्णय घेण्यात येतात. विदर्भाच्या विकासासाठी नागपूर येथे हिवाळी अधिवेशन तर मराठवाड्याच्या विकासासाठी मंत्री मंडळाची बैठक घेण्यात येते अशी अनेक वर्षापासूनची परंपरा आहे. परंतु तत्कालीन मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण, पृथ्वीराज चव्हाण, देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यकाळात या बैठका झाल्या नाहीत. तर तत्कालीन मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांनी पहिल्या वर्षी औरंगाबाद येथे मंत्री मंडळाची एक दिवसीय बैठक घेतली होती. त्यानंतर बैठक झाली नाही परिणामी मराठवाड्यातील प्रश्नांकडे राज्य शासनाचे दुर्लक्ष होत असल्याची भावना मराठवाड्यातील जनतेतून होत आहे. ही सर्वसामान्य जनतेची भावना लक्षात घेता सदर बैठक घेणे फार आवश्यक असून यामध्ये मराठवाड्याच्या विकासासोबतच जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासामध्ये सुद्धा याचा महत्त्वाचा वाटा राहील प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी अनेक सिंचन प्रकल्प एमआयडीसी संदर्भातील विषय तसेच रस्त्यांच्या संदर्भातही बऱ्याच प्रमाणात अनुशेष दूर होईल तसेच शेतकरी बळीराजांच्या सन 2018 पासून चे पीक विम्याचे अनुदान देखील प्राप्त झालेले नाही आणि यावर्षी तर जिल्ह्यामध्ये बरीचशी मंडळे अनुदानापासून वगळण्यात आली आहेत आणि सोयाबीनवर तर येलो मोझॅक या रोगाचा प्रचंड प्रमाणात प्रादुर्भाव झाल्याचे दिसून येत आहे यामुळे बळीराजाच्या हाता तोंडाशी आलेला घास देखील या नुकसानीमुळे जाणार आहे या सर्व गोष्टींचा विचार केल्यास सदर बैठक होणे गरजेचे आहे,

तरी मराठवाड्याच्या विकासासाठी औरंगाबाद येथे दोन दिवसीय मंत्री मंडळाची बैठक घेण्यात यावी व त्या घोषणांची तात्काळ अंमलबजावणी करुन मराठवाड्यास न्याय देण्यात यावा असे निवेदन आमदार मेघना साकोरे बोर्डीकर यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिले.

# माहेर ग्रा.पं.च्या रस्त्यासाठी 60 लाख रुपयांची तरतूद

आधुनिक केसरी न्यूज



**परभणी :** पूर्णा तालुक्यातील बानेगाव अंतर्गत माहेर ही गट ग्रामपंचायत असून सदर गावात रस्ता आणि पुलाच्या बांधकामासाठी जिल्हा परिषद प्रशासनाने उपाय योजना केली असून गावातील रस्त्याच्या कामासाठी साठ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी शिवानंद टाकसाळे यांनी माहेर ग्रामपंचायतीच्या रस्त्याचे आणि पुलाचे काम तात्काळ मार्गी लावण्यासाठी संबंधित यंत्रणांना तात्काळ आदेशित केले आहे. माहेर या गावास ग्रा.मा. 80 माहेर ते मुंबर 4.5 की.मी, ग्रा.मा. 79 माहेर जोडरस्ता रा.मा. 235 पासून ग्रा.मा. ग्रा.मा. 78 ला मिळणारा मार्ग, ग्रा.मा. माहेर ते फुलकळस 5.0 की.मी. याप्रमाणे तीन पोहोच रस्ते आहेत. सदर रस्त्यावर नाबार्ड अंतर्गत सार्वजनिक बांधकाम विभागाकडून पुलाचे काम सुरू आहे. सदर रस्त्याची शाखा अभियंता व उपमुख्य कार्यकारी अभियंता यांनी पाहणी करून अंदाजपत्रक तयार केले असून सदरील रस्ता जिल्हा नियोजन समिती सन 2022 - 23 मध्ये प्राधान्याने घेण्यासाठी रुपये साठ लाख एवढ्या निधीची मागणी केली असून निधीस मंजुरी मिळताच रस्त्याचे काम सुरू करण्यात येणार आहे. उपविभाग परभणी मार्फत मैल कामगार मार्फत रस्ता

# टिटवी जि.प. शाळा व्यवस्थापन समिती निवडणूक बिनविरोध

## सरपंच भगवानराव कोकाटेंच्या प्रयत्नाला यश



आधुनिक केसरी न्यूज

**लोणार :** येथील शाळा व्यवस्थापन समितीमध्ये सरपंच तथा बुलढाणा जिल्हा अध्यक्ष बिरसा क्रांती दल भगवानराव कोकाटे यांच्या पॅनलचे नऊ सदस्य होते. त्यामध्ये वर्ग पहिला मध्ये 1) सतीश नारायण कोकाटे व शिला गजानन लोखंडे. 2) वर्ग दोन मध्ये श्याम त्र्यंबक तनपुरे व रेखा राजेश कुठे वर्ग 3)तिसरी मध्ये राधाबाई रामराव कोकाटे वर्ग 4)चौथा मध्ये रुख्मिना शांताराम जटाळे वर्ग 5) पाचवा गजानन बंधू राठोड वर्ग 6) सहावा दत्ता लक्ष्मण घाटे वर्ग7) सातवी मध्ये वनिता मारुती गायकवाड या नवीन सदस्यांची बिनविरोध निवड झाली. त्याबद्दल भगवानराव कोकाटे यांनी मागील कार्यकाळामध्ये विद्यार्थ्यांना शाळेचे दर्जेदार शिक्षण संस्कृत विद्यार्थी घडविणाऱ्या ISO, आंतरराष्ट्रीय शाळेचा दर्जा मिळवला त्याचा हा दाखला म्हणून गावकऱ्यांनी विरोधकाच्या विरोधकाला बळी न पडता बिनविरोध निवडून दिल्याबद्दल सर्व गावकऱ्यांचे व विरोध न केल्याबद्दल विरोधकांचे आभार मानले. यावेळी तंटामुक्ती अध्यक्ष रामचंद्र कोकाटे, ज्ञानेश्वर डोळे, गेंदू राऊत, फकीर तनपुरे, भगवान कोकाटे, बबन कोकाटे, एकनाथ घाटे, संतोष राऊत, संतोष तनपुरे, पिराजी कोकाटे,संतोष चिभडे, नंदू डोळे, प्रकाश राऊत, प्रकाश तनपुरे, सोनाजी राऊत, पंढरीनाथ जाधव, पंढरीनाथ कोकाटे, माधव गोरे, तुकाराम तनपुरे, भगवान दांडेकर, मारुती गिऱ्हे, संजू कोकाटे संतोष कोकाटे, मनोहर तनपुरे, संभाजी कोकाटे, राम तनपुरे, संतोष हेंद्रे, रमेश पवार, भगवान जाधव व इतर कार्यकर्त्यांनी सहकार्य केले.



# श्री बालाजी मंदिर, टिळकनगर येथे नवरात्री उत्सवास सुरुवात

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** श्रीव्यंकटरमणा बालाजीमंदिर टिळकनगर येथे नवरात्रोत्सवाची सुरुवात आदिशक्ती भजनी मंडळाच्या आयोजित कार्यक्रमाने झाली यात श्रीसुक्त, गजर व्यंकटरमणाचा, दार उघड बये आता दार उघड, गवळण, जोगवा, गोंधळ, आई गिरीनंदिनी ई सादर करण्यात आली. यात सहभागी संगिता मंडलिक, दिपाली निनावे, उज्वला पैठणे, मंजली कुलकर्णी, जयश्री चोबे, भारती चोबे, रोहिणी भाले, राधिका गोस्वामी, अनघानाईक, मनिषा कडेपूरकर, सुमती खडके, ज्योती काळेगावकर, सुप्रिया खोपटीकर, प्रियंका दसगावकर, किरण पाटील. नवरात्रोत्सव निमित्ताने टिळकनगरमधील बालाजीमंदिर मध्ये रोज पाच ते सात यावेळेत भजन भारूड, व्याख्यान या विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेतसर्वांनी सहभागी व्हावे.

# राजूभाऊ राठोड यांची संभाजीनगर शिवसेना जिल्हाप्रमुखपदी निवड

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** येथे आज राजूभाऊ राठोड यांची संभाजीनगर शिवसेना जिल्हा अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल शिक्षक सेना सोयगावच्या वतीने छोटेखानी सत्कार समारंभ करण्यात आला. याप्रसंगी शिक्षकसेना मराठवाडा उपाध्यक्ष सुधाकर कापरे, सचिन पाटील, उमेश महालपुरे,तालुका अध्यक्ष रवींद्र शेळके, सुभाष परदेशी जिल्हा उपाध्यक्ष, विकास पवार, सुभाषभाऊ शिंदे, संसारे दादाभाऊ , किरण गढरी, बी. वाय. पाटील, प्रकाश माने, अशोक पाटील, मंगेश महालपुरे, विनोद महालपूरे, आर. एस. पाटील, विजय सोनवणे गोविंदसिंग सोळंके, समाधान चोपडे, योगेश उभाळे, चेतन पाटील, जगदीश राठोड, प्रेमादास पवार, ललित सोनवणे, महादू नगरे,संदीप येवले, बी एच पाटील, आर. एम. गढरी, बटेसिंग वसावे, योगेश पाटील, सुजित फलके, क्षीरसागर, बागुल, सतीश महाजन, सतीश कुंभार, प्रकाश बोरसे, विकास परदेशी, विकास देशमुख, विनोद परदेशी, रवी पाटील, भगवान जाधव, विलास शिंदे,अनमोल शिंदे, आर. के. चौधरी, बयास ,संतोष पवार, स्वप्नील सूर्यवंशी, अडसूळ, संजय चौधरी, शरद पाटील किशोर बिरारी, रवी पाटील, बी एच पाटील, पंकज देशमुख, डी.जे. राठोड, आर पी पाटील,विनोद बिंदवाल, हनुमंत रोकडे, संजय निकम, सोनार हनुमंत निकम शिक्षक आदी सर्व शिक्षक सेना पदाधिकारी उपस्थित होते. सत्काराला उत्तर देतांना राजेंद्र राठोड यांनी माझ्या राजकीय जीवनात शिक्षकाला महत्वाचे स्थान असून त्यांचेकडून मला कायम प्रेरणा मिळत असते. शिक्षक म्हणजे माझे कुटुंब आहे असे गौरव उद्गार जिल्हा अध्यक्ष यांनी काढले.



# गायरान जमिनीवर फ्रेंड्स क्लब, पेट्रोल पंपाचे अतिक्रमण

## औरंगाबाद उच्च न्यायालयात याचिका दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**सेलू :** येथील रेल्वे स्टेशनलगत असलेल्या सर्वे नंबर 160 व 215 ही गायरान जमीन असून त्यावर फ्रेंड्स क्लब ने 27 व्यापारी दुकानाचे संकुलासह सि .टी. पारीख यांचे भारत पेट्रोल पंप यासह असलेले अतिक्रमण तात्काळ काढण्यात यावे असे आदेश परभणीचे तत्कालीन जिल्हाधिकारी यांनी दिलेले असताना देखील पाच वर्षानंतरही अतिक्रमण न काढता जिल्हाधिकारी यांच्या आदेशाची अंमलबजावणी न झाल्यामुळे सदर प्रकरणाची जनहित याचिका औरंगाबाद येथील उच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेली आहे. याबाबतचे वृत्त असे की यापूर्वी यासंदर्भातील वृत्त प्रकाशित केले होते. त्यानुसार परभणीचे तत्कालीन जिल्हाधिकारी पी. शिवाशंकर यांनी सन 2017 मध्ये आदेश दिले होते की सेलू येथील रेल्वे स्टेशन लगत असलेली सर्वे नंबर 160 व 215 ही गायरान जमीन असून त्यावर सेलू तील फ्रेंड्स क्लब यांनी 27 व्यापारी दुकानाचे संकुल तसेच भारत पेट्रोल पंप यांना स्वतःचा भाडेकरी म्हणून जागा देऊन अनाधिकृतपणे अतिक्रमण केलेले आहे. सदरची अतिक्रमण तात्काळ काढण्यात यावे व त्याकरिता पोलीस मदत घेतली जावी असे स्पष्ट आदेश तत्कालीन जिल्हाधिकारी यांनी दिलेले असतानाही व त्यास पाच वर्षाचा कालावधी उलटून गेलेला असतानाही सदरच्या गायरान जमिनीवरील अतिक्रमण अद्यापही काढण्यात आलेले नाही. याबाबत सेलू येथील पत्रकार दिलीप डासाळकर यांनी जिल्हाधिकारी परभणी तसेच उपविभागीय अधिकारी सेलू यांना तक्रार देऊनही त्यावर कुठलेच कार्यवाही करण्यात आलेली नाही त्यामुळे पत्रकार दिलीप डासाळकर यांनी उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद येथील खंड पीठात जनहितार्थ याचिका दाखल केली असून ॲड. जनार्दन एम मुरकुटे यांचे मार्फत याचिका दाखल करण्यात आलेली आहे. या प्रकरणात महसूल खात्याचे सचिव जिल्हाधिकारी परभणी उपविभागीय अधिकारी परभणी उपविभागीय अधिकारी सेलू तहसीलदार सेलू मुख्याधिकारी सेलू व फ्रेंड्स क्लब सेलू यांना प्रतिवादी करण्यात आले असून ॲड. मुरकुटे यांना ॲड पूजा देशमुख ॲड अल्केश जाधव ॲड. जमीर खान हे सहकार्य करणार आहेत. सदर प्रकरण हे उच्च न्यायालयात गेल्यामुळे किमान सेलू तील शासकीय जागेवरील अतिक्रमण व इतर प्रश्न मार्गी लागावेत शिवाय भूखंड माफियांना आवर बसावा या हेतूने सदरची याचिका दाखल करण्यात आलेली आहे






# रूपाली वागरे यांना उत्कृष्ट लेखिका पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**उस्मानाबाद :** फुले-आंबेडकर विचारधारा साहित्य संमेलनात रुपाली वागरे/वैद्य यांना चित्रपट अभिनेते तथा सनदी अधिकारी असलेले अनिल मोरे यांच्या हस्ते राज्यस्तरीय उत्कृष्ट लेखिका पुरस्कार प्रदान करुन सन्मानीत करण्यात आले. पदक,मानचिन्ह,सन्मानपत्र,असे पुरस्काराचे स्वरुप होते. या साहित्य संमेलनात प्रमुख पाहुणे म्हणून प्रा.डॉ. राम वाघमारे, विलास सिंदगीकर, सा. द. सोनसळे, तर उद्धघाटक म्हणून भंते पय्याबोधी होते. सूत्रसंचालन प्रज्ञाधर ढवळे यांनी केले.संयोजक तुकाराम टोंपे, अशोक मल्हारे, मारोती कदम, एन.डी.गवळे, प्रभाकर ढवळे, प्रा.गजानन देवकर यांची उपस्थीती होती.

# मोलखेडा, हिवरी येथे रेंजच नाही

## नवीन टॉवर द्यावे; अतुल इंगळे ग्रा.पं.स.यांची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** मोलखेड्या गावात सावळदबारा येथे आयडीया ऐरटेल, वडाफोन कंपनीचा टॉवर असुनही या मोलखेडा/हिवरी या गावात फोर्जी रेंज इंटरनेट चालवण्यासाठी पुरेशी मिळत नसल्याने या परिसरातील रहिवाशी अक्षरशः त्रस्त झाले आहेत. तसेच या अतिदुर्गम भागात रेंज देखील पोहचत नाही तर अडी-अडचणीच्या वेळी नातेवाईकांशी संपर्क साधला जात नसल्याने येथील विद्यार्थी, नागरिक हैराण झाले आहेत. सोयगाव या तालुक्याच्या ठिकाणापासून साठ ते सत्तर किलोमीटरवर अंतरावर आणि सावळदबारा हे मोठे गाव असून या गावाच्या पाच किलोमीटर अंतरावर मोलखेडा हे गाव आहे. देव्हारी, चारूतांडा, घाणेगाव, नादातांडा व इतर वस्त्या आहेत. या परिसरात मोबाईलचे टावर असून सुद्धा मोबाईल सेवेचे तीन-तेरा वाजल्याचे चित्र दिसत आहे. या परिसरात मोबाईलवर पूर्ण रेंज दाखवत असतानाही फोन न लागणे, लागलाच तर तो काही सेकंदात कट होणे, समोरुन बोलणाऱ्या माणसाचा आवाज न येणे, आवाज आलाच तर तो गुंतत गुंतत ऐकू येणे, खरखर आवाज येणे, इंटरनेट ओपन न होणे, नेटवरील फाईल डाऊनलोड न होणे, युट्यूब वर बफरिंग दाखवणे, इंटरनेटला अपेक्षीत स्पिड न मिळणे, फोरजीची रेंज मोबाईलवर दाखवत असली तरी नेट सुरु न होणे, अशा विविध समस्यांना या आदिवासी अतिदुर्गम भागातील ग्राहकांना सामोरे जावे लागत असल्याचे नागरिक चिंता व्यक्त करत आहेत.

मोलखेडा येथे दोन आपले सरकार महा-ई सेवा केंद्र असून मोलखेडा या गावात रेंज नसल्याने शेतकऱ्यांना केंद्रात आल्यानंतर तासन तास टातकळ उभे राहावे लागते तरी शासकीय कामाची वेबसाईट गावामध्ये चालत नाही शेतकऱ्यांना नाहक त्रास भोगावा लागत आहे . आम्हाला नवीन टॉंवर देण्यात यावे अशी मागणी सरपंच मनिषाताई ज्ञानेश्वर वारंगणे व अतुल इंगळे ग्रामपंचायत सदस्य यांनी लेखी निवेदनाद्वारे केली आहे .

# तिडका, जंगलीकोठा येथे सेवा पंधरवडा

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील तिडका व जगंलीकोठा येथे सोयगाव कृषी विभागाच्या वतीने तालुका कृषी अधिकारी एस. जी. वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली सेवा पंधरवाडा कार्यक्रम घेण्यात आला सेवा पंधरवड्यात कृषी विभागाच्या शेतकऱ्यांना विविध योजना व रब्बी ज्वारी प्रकल्प व रब्बी हंगाम नियोजन विषयी सविस्तर मार्गदर्शन शेतकऱ्यांना करण्यात आले. रब्बी हंगामात शेतकऱ्यांना हरभरा बियाणे 50% अनुदानावर उपलब्ध होणार असून त्यासाठी शेतकऱ्यांनी mahadbt वर ऑनलाईन अर्ज करावे असे कृषी सहाय्यक हेमंत देशमुख, कृषी सहाय्यक एस.जी. बोरसे यांनी सांगितले या कार्यक्रमाच्या वेळेस कृषि सहाय्यक सचिन पाटील, गावातील सरपंच उपसरपंच ग्रामपंचायत सदस्य व शेतकरी बंधू मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# देव्हारी येथे शालेय व्यवस्थापन समिती गठीत

आधुनिक केसरी न्यूज

**देव्हारी :** येथील जिल्हा परिषद मुलांच्या शाळेत नवीन शालेय व्यवस्थापन समिती गठित करण्यात आली. समितीचे अध्यक्षपदी विठ्ठल हरलाल चव्हाण यांची निवड करण्यात करण्यात आली. आज पाल्यांची व ग्रामस्थांची बैठक शाळेत घेण्यात आली. यामध्ये अध्यक्ष विठ्ठल चव्हाण, उपाध्यक्ष गोपाल चव्हाण, पत्रकार बहादुर चव्हाण, रवींद्र राठोड, सांडूलाल राठोड, जोतीलाल जाधव, संजय जाधव, सुरेश राठोड, शिक्षक प्रतिनिधी म्हणून उपशिक्षक दीपक चोपडे, मुख्याध्यापक एम. एम. गायकवाड आदींची एकमताने निवड करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी जि.प. सदस्य उत्तम चव्हाण, केसूला प्रतिष्ठान देव्हारी, चे. सदस्य, प्रदीप जाधव, अमोल डान्सर, बहादुर चव्हाण, अभिषेक राठोड, स्वागत चव्हाण, चंदन चव्हाण, पवन राठोड, देविदास चव्हाण, देवीदास राठोड, सुजित चव्हाण, गोवर्धन राठोड, आकाश देवराज राठोड, तुषार राठोड, अमोल राठोड, अंकुश राठोड, चेतन राठोड, सुरेश काळे यांच्यासह पालक, ग्रामस्थ व विद्यार्थी उपस्थित होते. या सर्व सदस्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन शिक्षक नितीन मोरे यांनी तर आभार मुख्याध्यापक एम.एम. गायकवाड यांनी मानले.



# मोलखेडा येथे लम्पी आजाराने पहिला बळी; शेतकरी चिंतित

## शेतकरी शिवाजी मंख यांना नुकसान भरपाई देण्याची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील मोलखेडा फर्दापूर जिल्हा परिषद सर्कलमध्ये सावळदबारा परिसरात पशुसंवर्धन विभागाच्या वतीने लसीकरण मोहीम राबविली जात असली तरी लम्पी स्किन आजाराचा धोका अजूनही टळला नसल्याचे मोलखेडा गावात दिसून आले आहे. शेतकरी व पशुपालकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाल्याचे दिसत आहे. सावळदबारा पशुवैद्यकीय केंद्रा अंतर्गत येणाऱ्या परिसरात मोलखेडा, देव्हारी, डाभा, नादातांडा, टिटवी व सावळदबारासह आतापर्यंत नेमक्या किती गुरांना लम्पी स्किन आजाराची लागण झाली आहे.सर्कलमधील सावळदबारा पशुवैद्यकीय केंद्रा अंतर्गत येणाऱ्या मोलखेडा गावात लम्पी स्किन आजाराने पहिला बळी घेतला आहे. शेतकरी शिवाजी मंख मोलखेडा ता सोयगाव यांचा बैल लम्पी स्किन आजारामुळे दगावला यावेळी पशुवैद्यकीय अधिकारी यांच्या हस्ते पंचनामा करण्यात आला.यावेळी सरपंच ज्ञानेश्वर वारंगणे, डिंगाबर पाटील, अमोल शेळके व ग्रामस्थ उपस्थित होते. शिवाजी मंख यांचा बैल दगावल्याने शेतकरी व पशुपालकांमधे चिंतेचे वातावरण तयार झाले आहे. याबाबत अधिकृत आकडेवारी उपलब्ध झाली नसली तरी गुरुवारी सकाळी शिवाजी मंख यांच्या बैलाचा लम्पी स्किन आजाराने मृत्यू झाल्याची घटना सकाळी दि.२६/९/२२ सोमवारी उघडकीस आली आहे. शेतकरी शिवाजी मंख यांना तत्काळ नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी अतुल इंगळे ग्रामपंचायत सदस्य यांनी केली आहे.





# माता सुरक्षित तर घर सुरक्षित मोहीमेचा शुभारंभ

आधुनिक केसरी न्यूज

**उस्मानाबाद :** ग्रामीण रुग्णालय वाशी व महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान तालुका अभियान व्यवस्थापन कक्ष पंचायत समिती वाशी आणि आरोग्य विभाग पंचायत समिती वाशी यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय फूड फेस्टिवल आणि नवरात्र महोत्सव अंतर्गत माता सुरक्षित तर घर सुरक्षित या कार्यक्रमाचे उद्‌घाटन स्त्रीरोग तज्ञ तथा ग्रामीण रुग्णालय वाशी चे वैद्यकीय अधिक्षक डॉ.प्रमोद शिंदे सर यांच्या हस्ते करण्यात आले 26 सप्टेंबर ते 09 ऑक्टोबर 2022 या नवरात्र कालावधी त 18 वर्षावरील सर्व माता भगणीची आरोग्य तपासणी करण्यात येणार असून या संदर्भात डॉ.प्रमोद शिंदे सर यांनी उपस्थित महीलांना मार्गदर्शन केले.तसेच या कार्यक्रमांमध्ये उपस्थित सर्व कॅडरच्या उपस्थित 32 महिलांची बीपी, शुगर,एच आय व्ही , सी बी सी,इ.आरोग्य तपासणी करण्यात आली . यावेळी आयसीटीसी समुपदेशक श्री परमेश्वर तुंदारे, एनसीडी समुपदेशक श्री उत्तरेश्वर उबाळे, प्रयोग शाळातंत्रज्ञ श्री. संतोष बुधोडकर, महालॅब चे प्रयोगशाळा तंत्रज्ञ वैभव कवडे, वैशाली गायकवाड तालुका अभियान व्यवस्थापक अर्चना गडदे तालुका व्यवस्थापक प्रियदर्शनी कांबळे प्रभाग संघ व्यवस्थापक तेरखेडा उमेद अंतर्गत कार्यरत सर्व कॅडर उपस्थित होते.

# बेकायदेशीर उड्डाणपूल पाडून सुधारित पुलाची निर्मिती करा

## चितोड ग्रामस्थ यांचे जिल्हा अधिकारी कार्यालयासमोर आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** सुरत बायपास हायवे लगत चितोड चौफुलीवर असलेला उड्डाण पुल ( धुळे शहराकडून चितोड, रावेर, दहयाने, मार्गे मालेगाव या रस्त्याचे चौफुली वरील उड्डाणपुल ) हा मुळात बेकायदेशीररित्या राष्ट्रीय महामार्ग विभागाची व स्थानिक प्रशासनाची दिशाभूल करून सदरचे बांधकाम केलेले आहे. तसेच सदरचा उड्डाणपुल धोकेदायक स्वरूपाचा असून याठिकाणी जे भुयारी मार्ग ( येण्या - जाण्यासाठी ) बनिवण्यात आलेले आहेत ते नियमास धरून नसून चुकीच्या पध्दतीने बांधकाम केलेले आहे .असे स्थानिक ग्रामस्थ यांनी सांगितले व प्रथमदर्शनी या पुलाचे नकाशाचे अवलोकन केले असता आउट व इन मार्ग नियमास धरून नाही . येण्या - जाण्याचा भुयारी मार्ग अंध मार्ग झालेला आहे त्यामुळे चौफुलीवर वारंवार अनेक लोकांना आपले प्राण गमवावे लागले आहेत. अनेक लोकांना अपंगत्वाला सामोरे जावे लागले आहे. भविष्यात देखील सदरच्या मार्गामुळे अपघात होवून मोठी जिवीतहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.



परिसरातील नागरीक तसेच येणारे जाणारे पादचारी, दुव्हीलर, फोरव्हिलर या सर्वांसाठी धोकेदायक उड्डाणपुलामुळे चिंतेची बाब बनलेली आहे . सदर उड्डाणपुलाचा पुर्वीचा नकाशा सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी व रस्ते निगम यांच्या प्रमुख अधिकारी यांनी यापूर्वीच सदरच्या उड्डापुलाला बेकायदेशीर ठरवून व जे बांधकाम झाले होते ते बेकायदेशीर ठरवून तसा शेरा मारुन त्याप्रमाणे दाखले दिले होते . परंतू काही भ्रष्ट अधिका - यांनाहाताशी धरून रिवाईस प्लॅन करून पुर्वीचाच प्लॅन रेग्युलर करण्यात आला.

सदर चौफुलीवरील उड्डाणपूल बांधकामाचे ठेकेदार व संबंधीत अधिकारी यां संगनमत करून प्रशासनाची दिशाभूल करून कोटयावधी रुपयांची अफरातफर केलेली आहे . त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची देखील चौकशी करण्यात यावी व चौकशी करून संबंधीतांवर गुन्हे दाखल करण्यात यावे असे ह्या निवेदनात म्हटले सदर मोतीनाल्याचे पात्र अरुंद करण्यात आल्यामुळे प्रत्येक वर्षी चितोड ग्रामस्थांना व परिसरातील नागरिकांना याचा मोठा फटका बसतो व मुजोर ठेकेदार मनमानी करुन दुर्लदा करतो . त्यामुळे सदर ठेकेदारावर देखील कार्यवाही करून त्याच्याकडून वैयक्तिकरित्या नुकसान ग्रस्त लोकांना नुकसान भरपाई मिळवून दयावी, उड्डाण पुलाच्या उत्तरेला महेश्वर नगर असून त्याला लागुन सर्व्हिस रोड आहे. सदरचा सर्व्हिस रोड हा मोतीनाला व महेश्वर नगर यास लागुन आहे .

नाल्याचे पात्र नैसर्गिकरित्या पूर्वी पासून १५० ते २०० फुट अंतराचे होते , परंतू चारपदरी करणाचे राष्ट्रीय महामार्गाचे कामाचे पुर्वीचे व आताचे ठेकेदार यांनी मनमानी कारभार करून NHI - 2 वरिष्ठ अधिकारी व जिल्हा प्रशासनाची दिशाभूल करून कोटयावधी रुपयांची आर्थिक लुट करण्यासाठी नाल्याचे पात्र फक्त १० ते १७ फुट इतकेच शिल्लक ठेवलेले असल्याने चितोड गावातील वरचे गाव , खाल गाव महेश्वर नगर , हटकरवाडी खंडेराव मंदिराजवळ परिसर या संपूर्ण परिसरा नाल्याच्या पुराचे पाणी रात्री - अपरात्री परिसरातील रहिवाशांच्या घरात घु संसारापयोगी वस्तुंचे तसेच अन्न - धान्य या सर्वच बाबींचे मोठ्या प्रमाण नुकसान झालेले आहे.

जर सुधारीत पध्दतीने नविन उड्डाणपुलाची निर्मित नाल्याचे रुंदीकरण केल्यास कोणत्याही प्रकारचा धोका परिसरातील नागरिक इतर लोकांवर होणार नाही . परंतू ठेकेदारांनी स्वतःची आर्थिक लुट करण्यास मनमानी कारभार चालविलेला आहे असे सांगून संताप व्यक्त केला व आम्हाला न्याय मिळावा या साठी जिल्हा अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.

# गणपती मंदिर पुलावरून तरुणाने केली आत्महत्या

आधुनिक केसरी न्यूज



**धुळे :** गणपती मंदिर पुलाजवळ पांझरा नदीत उडी घेऊन तरुणाने आत्महत्या केली आहे. आई वडिलांपासून वंचित असलेला व खूप हुशार शाळकरी विद्यार्थी मानसिक तणाव असल्यामुळे त्याने हे पाऊल उचलले, अशी चर्चा नागरिकांमध्ये होती. गरुड कॉलनीत राहणाऱ्या तरुणाने आज दुपारी सिध्देश्वर गणपती मंदिराच्या पुलावरुन पांझरेत उडी घेतली. पोलिसांच्या हद्दीच्या वादात बराचवेळ शोध मोहिम अडकली. विशेष म्हणजे या तरुणाने आत्महत्येपूर्वी त्याच्या मित्रांना घटनेची माहिती दिली होती. मित्रांनी त्याची समजुतही काढली. त्यानंतरही सदर तरुणाने आत्महत्त्या केली.या घटनेमुळे देवपुर परिसरात प्रचंड खळबळ उडाली आहे. घटनास्थळी मोठी गर्दी झाली असून पट्टीचे पोहणारे तरुण तसेच आपत्कालीन पथकाचे कर्मचारी पांझरेत उडी घेतलेल्या तरुणाचा शोध घेत आहेत. गुरुड कॉलनीतील प्लॉट नं .३० येथे विजय पाटील हे राहतात. त्यांच्याकडे त्यांचा नातलग असलेला तरुण रोहित प्रदीप बोरसे ( वय २८ ) हा राहत होता. त्याने अभियांत्रिकेचे शिक्षण घेतल्याची माहिती मिळत आहे. गेल्या दोन तीन वर्षांपासून तो स्पर्धा परिक्षांची तयारी करीत होता. पांझरेत अडकलेला रोहित याचे आई बाबा दोघे मयत झाल्याचे घटनास्थळी बोलले जात होते. अनाथ असलेला रोहित त्यामुळेच नातलगांकडे राहत होता. गेल्या काही दिवसांपासून तो नैराश्यतेत वावरत असल्याचे घटनास्थळी त्याच्या काही मित्रांनी सांगितले. आज सकाळी त्याने मित्रांना मी आत्महत्त्या करायला जात असल्याचे सांगितल्यानंतर घटनास्थळ गाठले मात्र ते पोहचण्याच्या आधीच सिध्देश्वर असलेल्या मंदिरालगत पुलावरून त्याने पांझरेत उडी घेतली. त्याने पांझरेत उडी घेताच मित्रांनी आरडा ओरड केला. पोहणारे तरुण आले. मोठी गर्दी जमा झाली होती. घटनास्थळी त्याच्या शोधासाठी शर्थीचे प्रयत्न केले. परंतु दुपारी २ वाजेपर्यंत त्यांना यश आले नाही , घटनेची माहिती पोलिसांना कळविण्यात आली. मात्र पोलिस हद्दीचा मुद्दा पुढे करत होते. हा खेळ जवळपास अर्धातास सुरु होता. त्यानंतर पोलिस प्रशासन घटनास्थळी आले आपत्कालीन व्यवस्थापन दलही आले होते.

# संभाजी ब्रिगेडचे जोडे मारो आंदोलन




आधुनिक केसरी न्यूज

**मानवत :** येथे २८ सप्टेंबर बुधवार रोजी मानवत तालुका संभाजी ब्रिगेडच्या वतीने मानवत शहरातील छत्रपती शिवाजी महाराज स्मारक या ठिकाणी जोडे मारो आंदोलन करण्यात आले. महाराष्ट्र राज्याचे आरोग्य मंत्री मा. तान्हाजी सावंत यांनी उस्मानाबाद येथील एका कार्यक्रमात मराठा आरक्षणा बाबत बेजबादार व्यक्तव्य केल्या बद्दल समस्त मराठा समाज बांधवाच्या भावना दुखावल्या मुळे या वक्तव्याचा मानवत तालुका संभाजी ब्रिगेडच्या वतीने जाहीर निषेध करण्यात आला. या वेळी मा. तान्हाजी सावंत यांच्या प्रतिकात्मक पुतळ्यास जोडे मारून जाहिर निषेध करण्यात आला. या वेळी मानवत तालूका संभाजी ब्रिगेडचे तालुकाध्य गोविंद घांडगे पाटील, माऊली चांगभले पाटील, राजेभाऊ होगे पाटील, गोपाळ पिंपळे पाटील, सुरज काकडे पाटील, धनंजय काळे पाटील, मोहन शिंदे पाटील, हनुमान मस्के पाटील, स्वप्नील शिंदे पाटील, सुनील कापसे पाटील, बंडु शिंदे पाटील, आसाराम तुपसमुंद्रे, यांच्या सह या वेळी संभाजी ब्रिगेडचे व मराठा सेवा संघांचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांची या वेळी मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# इयत्ता तिसरीच्या विद्यार्थ्यांनी भरवलेला भाजी मंडई बाजार पाहून पाहुणे भारावले





आधुनिक केसरी न्यूज

**अंबाजोगाई :** स्वामी विवेकानंद बाल विद्या मंदिर अंबाजोगाई येथे एक अनोखा उपक्रम घेण्यात आला. या उपक्रमांमध्ये इयत्ता तिसरीच्या विद्यार्थ्यांनी भाजी मंडईचा बाजार भरवून सर्वांना भारावून टाकले. या भाजीमंडई साठी उद्घाटक म्हणून लाभलेले पाहुणे धनराज सोळंकी सर यांनी कार्यक्रमाचे उद्घाटन करून सर्व विद्यार्थ्यांकडून भाजीपाला खरेदी करून विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले, तसेच नेहमीच उपक्रमशील असणारी ही शाळा नाविन्यपूर्ण उपक्रम घेते व विद्यार्थ्यांना स्वावलंबनाचे धडे देते. यासाठी सर्व शिक्षकांचे कौतुकही केले. या कार्यक्रमासाठी आवर्जून उपस्थित राहिलेले नवक्षितिज बहुउद्देशीय शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आदरणीय संतोष दादा कुलकर्णी यांनाही चिमुकल्यांचा उत्साह पाहून या भाजी मंडईतून बाजार खरेदी करण्याचा मोह आवरला नाही. सर्व विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे कौतुक करत विद्यार्थ्यांना विविध प्रश्न विचारत विद्यार्थ्यांचे व्यावहारिक ज्ञान किती आहे हे तपासले. शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती. दीपाली जाधव यांनी गणित या विषयातील नाणी व नोटा हा घटक भाजी मंडईचा हा बाजार भरवून विदयार्थ्यांचे व्यावहारीक ज्ञान समृद्ध करण्यासाठी हा बाजार भरवला. या मध्ये इ. 4 थीच्या विद्यार्थ्यांनी बाजारामधून विविध वस्तू खरेदी करून या बाजारातील ग्राहकांची भूमिका बजावत स्वतःचे व्यावहारिक ज्ञान समृद्ध केले. गणितातील नाणी नोटांच्या संकल्पना शिकवण्याचा हा प्रयत्न या भाजी मंडई मधून खऱ्या अर्थाने यशस्वी झाला असे संस्थेच्या सचिव स्वरूपा ताई डिग्रसकर म्हणाल्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रतीक्षाताई यांनी केले व भाजी मंडईचा बाजार यशस्वी करण्यासाठी इ 3 री व 4 थी ला शिकवणाऱ्या श्रीमती. प्रांजलीताई, श्रद्धाताई, पूजाताई, अंजलीताई, आकांक्षाताई, पूजा ताजने व अश्विनीताई यांनी सहकार्य केले.

# वाहनाच्या धडकेत तरुणाचा मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**सोनपेठ :** तालुक्यातील शिर्शी ( बु. ) येथील ज्ञानेश्वर रमेश कांदे या २९ वर्षीय तरुणाचा सोनपेठ कडून स्वताचे दुचाकीवरून गावाकडे जात असताना दि.२१ सप्टेंबर रोजी भरगाव वेगाने आलेल्या अज्ञात वाहनाने चिरडून मृत्यू झाल्याची घटना सोनपेठ शहरातील शेळगाव रोडवरील बसवेश्वर चौकात घडली आहे. सोनपेठ तालुक्यातील शिर्शी बु येथील ज्ञानेश्वर रमेश कांदे हे गावामध्ये किराणा दुकान चालवून शेती व्यवसाय करतात. ते कामानिमित्त २१ सप्टेंबर रोजी सोनपेठ येथे आले होते. संध्याकाळी साडेनऊ वाजण्याच्या सुमारास दुचाकी क्रमांक एम.एच.२२ ए.एल.७१७१ वर बसून गावाकडे परतत असताना, शेळगाव रोडवर असलेल्या बसवेश्वर चौकापर्यंत गेले असता अचानक भरगाव वेगाने आलेल्या अज्ञात वाहनाने त्यांच्या दुचाकीला जोराची धडक दिली. यावेळी झालेला अपघात हा एवढा भयंकर होता की दुचाकीचा पार खळींगा होऊन ज्ञानेश्वर कांदे हे रस्त्याच्या कडेला जखमी अवस्थेत पडले. त्यांच्या डोक्याला जबर मार लागल्याने घटनास्थळी मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव झाला होता. त्यांची परिस्थिती अत्यंत गंभीर असल्याचे पाहून त्यांना पुढील उपचारासाठी परभणी येथील सरकारी दवाखान्यामध्ये हलविण्यात आले. उपचारदरम्यान परभणी येथील शासकीय दवाखान्यातील डॉक्टरांनी त्यांना दिनांक २२ सप्टेंबर च्या पहाटे मृत घोषित केले. त्यामुळे ज्ञानेश्वर कांदे यांच्या पत्नी स्वाती ज्ञानेश्वर कांदे यांच्या फिर्यादीवरून सोनपेठ पोलीस ठाण्यामध्ये अज्ञात वाहन धारकाच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून प्रकरणाचा पुढील तपास सोनपेठ सहायक पोलिस निरीक्षक संदीप बोरकर यांच्या मार्गदर्शनाखाली फौजदार विष्णु गिरी हे करत आहेत.

# औद्योगिक वसाहतीची कार्यवाही जलद करा

## आ. फारूक शाह यांची उद्योग मंत्र्यांसोबत चर्चा

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** औद्योगिक वसाहतीसाठी रावेर शिवारातील जमीन अधिग्रहित करणे ,अग्निशमन केंद्र व स्वतंत्र सुसज्ज कार्यालयासाठी तत्काळ कार्यवाही करणेबाबत उद्योग मंत्री ना.उदय सामंत यांनी अधिकाऱ्यांना दिले निर्देश.
शहरालगत असलेल्या रावेर शिवारातील जमीन हि M.I.D.C. साठी शासनाने अधिग्रहित केलेली आहे. परंतु जमिनीच्या अधिग्रहित करण्याच्या कार्यवाहीत वनविभागाची अडचण येत आहे. धुळे शहरातील महामार्गालगत असलेल्या M.I.D.C. ची जागा अपूर्ण पडत असून त्यासाठी शासनाने रावेर शिवारातील जागेची निवड केली होती. परंतु प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या कासव गतीच्या कामामुळे हे काम रेंगाळलेले आहे. या संदर्भात मा.मुख्यमंत्री सो. यांनी मालेगाव येथील विभागीय आढावा बैठकीत जमीन अधिग्रहित करणेबाबत आदेश दिले होते.
यासंदर्भात दि.२७ सप्टेंबर रोजी आ.फारुख शाह यांनी महाराष्ट्र राज्याचे उद्योग मंत्री ना.उदय सामंत यांची भेट घेवुन चर्चा केली. त्यानुसार धुळे औद्योगिक वसाहतीसाठी अग्निशमन केंद्र व स्वतंत्र सुसज्ज कार्यालयासाठी तत्काळ कार्यवाही करणेबाबत उद्योग मंत्री ना.उदय सामंत यांनी संबंधित अधिकाऱ्यांना निर्देश दिलेत. I. उदय सामंत यांच्याशी चर्चा करतांना



आ.फारुख शाह यांनी धुळे औद्योगिक वसाहतीशी संबंधित विविध प्रश्न मांडले. धुळे शहरात मोठे उदयोग धंदे येत आहेत. त्या अनुषंगाने जिल्ह्यासाठी स्वतंत्र कार्यालयाची आवश्यकता आहे. सद्यस्थितीत दोन - तीन जिल्ह्यांचा कार्यभार एकाच वास्तूतून केला जात आहे. त्यामुळे एकूणच कार्यालयीन कामकाजावर विपरीत परिणाम होत असल्याने. धुळे M.I.D.C. साठी स्वतंत्र व सुसज्ज विभागीय कार्यालय ईमारत बांधणेसाठी निधी उपलब्ध करून देणे गरजेचे आहे.
गेल्या काही दिवसांपूर्वी मधुर इंडस्ट्रीज आणि केशरानंद जिनिंगला प्रमाणात आग लागली होती. या ठिकाणी धुळे महानगरपालिकेतून अग्निशमन दलाच्या गाड्या बोलावल्या होत्या परंतु धुळे शहरातून एम. आय. डी. सी. कडे जाणारा रस्ता हा खूप जास्तीचा वर्दळीचा व शहरापासून १० किमी अंतराचा असल्यामुळे अग्निशमनची गाडी वेळेवर घटनास्थळी पोहचली नाही. परीणामी मोठ्या प्रमाणात उद्योजकांचे नुकसान झाले. या घटनेमुळे फायर स्टेशनची आवश्यकता असल्याचे उद्योग मंत्री ना.उदय सामंत यांच्या निदर्शनास आणून दिले. ऑगस्ट २०१६ मध्ये औद्योगिक संघटनांनी फायर सेस भरण्यास तयार असल्याचा ठराव केला. या ठरावाचे पत्र एमआयडीसी प्रशासनाला दिल्या नंतरही सहा वर्षाचा कालावधी उलटला असूनही फायर स्टेशन झाले नाही. तरी अश्या घटनांवर नियंत्रण ठेवण्यासाठी अवधान एम. आय. डी. सी. धुळे येथे स्वतंत्र फायर स्टेशन उभारण्याची अत्यंत गरज आहे. यासंदर्भात उद्योग मंत्री ना.उदय सामंत यांनी लक्ष देवून सर्व समस्या समजून घेतल्या आणि तातडीने निधी उपलब्ध करून देणेबाबत संबंधित अधिकाऱ्यांना निर्देश दिलेत.



# राज्यस्तरीय बॉक्स लंगडी स्पर्धेत परभणी जिल्हा सर्वद्वितीय व तृतीय

आधुनिक केसरी न्यूज

**पाथरी :** बॉक्स लंगडी असोसिएशन ऑफ महाराष्ट्र राज्य यांच्या मान्यतेने शहर व जिल्हा बॉक्स लंगडी असोसिएशन, सोलापूर आयोजित कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या 135 व्या जयंतीनिमित्त सोलापूर जिल्हा व लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालय, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय बॉक्स लंगडी स्पर्धेचे आयोजन 24 व 25 सप्टेंबर 2022 रोजी करण्यात आले होते. या स्पर्धेत बारा वर्षांतील मुले व मुली तसेच पुरुष व महिला खुल्या गटाच्या स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धेत 21 संघानी सहभाग घेतला होता. या स्पर्धेत महिला गटाचा परभणी विरुद्ध ठाणे जिल्हा या संघामध्ये चुरशीचा अंतिम सामना झाला . या चुरशीच्या सामन्यात परभणी जिल्हा द्वितीय क्रमांक पटकावला तर मुलांमध्ये पुरुष गटाने तृतीय क्रमांक पटकावला. राष्ट्रीय स्पर्धेसाठी महिला गटातून परभणी जिल्ह्याच्या तीन मुलींची निवड झाली तसेच मुलांमधून दोन मुलांची निवड झाली आहे . या सर्व यशस्वी खेळाडूंचा परभणी जिल्हा बॉक्स लंगडी असोसिएशनचे अध्यक्ष अजिंक्य भैया नखाते यांनी सत्कार केला राष्ट्रीय स्तरावर निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील यशासाठी शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी परभणी जिल्हा बॉक्स लंगडी असोसिएशनचे सचिव भरत घांडगे उपाध्यक्ष तुकाराम शेळके कार्याध्यक्ष सहदेव पुरी, अनिल थोरे,प्रशिक्षक राम शहाणे सर यांनी अभिनंदन केले .परभणी जिल्हा बॉक्स लंगडी असोसिएशन या संघामध्ये वाल्मिकी शिक्षण प्रसारक मंडळ परभणी संचलित शांताबाई नखाते विद्यालय पाथ्री , कासापुरी, देवगाव फाटा, वालुर व जिल्हा परिषद केंदिय प्राथमिक शाळा पाथरगव्हान इत्यादी शाळेने सहभाग नोंदवला होता. या सर्व खेळाडूंनी घवघवीत यश प्राप्त करून दिले आहे. या सर्व यशस्वी खेळाडूंचे संस्थेचे अध्यक्ष अनिल भाऊ नखाते, सचिव सौ. भावनाताई नखाते, संचालक आदित्य भैया नखाते रमेश सरोदे मुख्याध्यापक डहाळे के. एन., मुख्याध्यापक यादव एन.ई., सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे .

# श्रीमती शकुंतला कांचनराव कत्रूवार विद्यालयात मेजर राऊत यांच्या हस्ते बक्षिस वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**मानवत :** येथील श्रीमती शकुंतलाबाई कांचनराव कत्रुवार प्राथमिक विद्यालयात भारतीय स्वातंत्र्याचा ७५ व्या अमृत महोत्सव यानिमित्ताने विद्यालयामध्ये सृर्जनात्मक विविध सांस्कृतिक स्पर्धा घेण्यात आल्या होत्या व त्या स्पर्धेच्या पारितोषिक वितरण कार्यक्रमासाठी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी ठरणाऱ्या व्यक्तिमत्त्वाला या वेळी आमंत्रित करण्यात आले मानवतच्या भूमिपूत्रांनी भारतीय सैन्यदलात २२ वर्ष कसोटीने व जिद्दिने देशसेवा केली. असे मेजर दिगंबर सुदामराव राऊत या मानवतच्या भूमिपुत्रास निमंत्रित करण्यात आले. त्यांच्या हस्ते शालेय विद्यार्थ्यांना पारितोषिकाचे वाटप करण्यात आले. यावेळी मेजर राऊत यांनी आपल्या जीवनातील विविध प्रसंग विद्यार्थ्यां समोर या वेळी मांडले. त्यातून देश सेवेबद्दल विद्यार्थ्यांना प्रेरणा दिली यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्रीमती शकुंतलाबाई कांचनराव कत्रुवार विद्यालयाचे सेवा निवृत्त मुख्याध्यापक मा. प्रविणजी बेले तर विद्यालयाचे मुख्याध्यापक मा. श्री. विश्वभूषण इंगोले , पर्यवेक्षक मा. विलास शिंदे यांची या वेळी उपस्थीती होती. या वेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती अश्विनीताई माकूडे यांनी केले तर सर्व मान्यवर व उपस्थितांचे आभार श्री बालाजी होंडे सर यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यालयाचे सांस्कृतिक विभाग प्रमुख श्री श्रीपाद दडके सर श्री. दत्तात्रय शिंदे सर शालेय प्रसिध्दी प्रमुख श्रीमती नीताताई बावगे यांच्यासह शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी मोलाचे सहकार्य केले.



# शालेय विद्यार्थ्यांची मोफत दंत तपासणी

आधुनिक केसरी न्यूज

**सोनपेठ :** शहरातील डॉ. सचिन कसपटे यांनी बुधवारी दहिखेड येथील




जिल्हा परिषद शाळेतील सर्वच विद्यार्थ्यांची मोफत दंत तपासणी करुन त्यांना दातांची निगा राखणे, दंतरोग व उपचार यासंदर्भात मार्गदर्शन केले. सोनपेठ येथील दंत रोग तज्ञ डॉ. सचिन कसपटे यांनी महिन्यातून 'एक दिवस मोफत सेवेसाठी' या संकल्पनेतून एका उपक्रमाची सुरुवात केली आहे. यापुढे ते प्रत्येक महिन्यातील एक दिवस तालुक्यातील विविध शाळेवर जाऊन तेथील विद्यार्थ्यांची मोफत दंतरोग तपासणी करणार असून त्यांना दातांची निगा राखणे, दातांचे विकार व उपचार याबाबत मार्गदर्शन करणार आहेत. यावेळी बुधवार रोजी त्यांनी सोनपेठ शहरातील दहिखेड परिसरात असलेल्या जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांच्या दातांची तपासणी केली. तसेच त्यांना मोफत औषधी गोळ्या देऊन दातांच्या आरोग्यासाठी मार्गदर्शन केले. त्यांच्या या उपक्रमशील सेवेची दखल घेऊन पालक वर्गातून आनंद व्यक्त केला जात आहे.

# धनगर टाकळी येथे रोखला बालविवाह

आधुनिक केसरी न्यूज

**पूर्णा :** जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयाला मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे आज पूर्णा तालूक्यातील धनगर टाकळी येथे बालविवाह रोखण्यात आला. जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयाला मिळालेल्या गोपनीय माहिती नुसार दि. 26 सप्टेंबर रोजी पूर्णा तालूक्यातील धनगर टाकळी येथे एका अल्पवयीन मुलीचा बालविवाह होणार असल्याची माहिती प्राप्त झाली होती. त्यानुसार मुलीचे नाव, लग्नाचे ठिकाण, मुलीच्या वयाचा पुरावा हस्तगत करण्यात आला. तसेच ग्रामसेवक आर.डी. घिरडकर, अंगणवाडी सेविका सुशिला पांचाळ, सरपंच-उपसरपंच यांच्या उपस्थितीत हा बालविवाह थांबविण्यात आला. जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कैलास तिडके यांच्या मार्गदर्शनाखाली संदीप बेंडसुरे, टिम मेंबर सय्यद इशरत, राणी गरुड, जिल्हा बाल संरक्षण कक्षाचे गजानंद पटवे, उपनिरीक्षक प्रकाश पंडीत यांनी कार्यवाही केली.

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत
(रविवारी मोफत तपासणी)
नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)



डॉ. शेख ए.एच.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in